दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | गुरूवार,दि.२२ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२७७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के



बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के


# बीड शिक्षण विभागात पाचशे कोटीचा घोटाळा

### शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, नागनाथ शिंदे चौकशीच्या फेऱ्यात

### इंजि.सादेक इनामदारांची शिक्षण मंत्र्यांकडे तक्रार

### संगनमताने कोट्यवधींचा घोटाळा केल्याच्या तक्रारी

### बीडमध्ये घोटाळे बाजांच्या उडाल्या झोपा

पुण्यभूमी प्रतिनिधी







बीड:जिल्ह्यातही प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षक भरतीत मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाल्याचे आरोप होत आहेत. भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष इंजि. सादेक इनामदार यांनी राज्याच्या शिक्षण मंत्र्यांकडे तक्रार केली होती . यावरून प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांच्या प्राथमिक चौकशीचे आदेश राज्याच्या शिक्षण विभागाने दिले आहेत.

राज्यात सध्या शिक्षक भरती घोटाळे चर्चेला येत आहेत. नागपूरमध्ये देखील शिक्षक भरती प्रकरणी चौकशी सुरु झालेली आहे. बीड जिल्ह्यातही शिक्षक भरतीमध्ये खाजगी शिक्षण संस्था चालक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी संगणमत करून कोट्यवधींचा घोटाळा केल्याच्या तक्रारी आहेत. पवित्र पोर्टलमध्ये खेळ करत आणि नित्यं डावलून शिक्षकांना नियुक्त्या देण्यात आल्या आणि त्या नियुक्त्यांना शिक्षण विभागाने मान्यताही दिली अशा तक्रारी आहेत. विशेष म्हणजे यासंदर्भातील कोणतीच माहिती दिली जात नव्हती. एवढेच नाही तर माहिती अधिकारात देखील द्यायला शिक्षण विभाग तयार नाही . या संपूर्ण प्रकरणात शेकडो कोटींची उलाढाल झाल्याच्या तक्रारी होत्या. या संदर्भात भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष इंजि . सादेक इनामदार यांनी राज्याच्या शिक्षण मंत्र्यांकडे तक्रार केली होती. त्यात प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी ४०० ते ५०० कोटींचा भ्रष्टाचार केल्याचे म्हटले होते. यावर शिक्षण मंत्र्यांनी शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना चौकशीचे निर्देश दिले होते. त्यानुसार शिक्षण विभागाने आता राज्याच्या शिक्षण आयुक्तांना या प्रकरणात प्राथमिक चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातही बोगस शिक्षक भरतीचा भांडाफोड होणार आहे.

## मंत्री पंकजा मुंडेंनेमुळे दिलासा!

### पशुसंवर्धन विभाग:सहायक आयुक्त पदाची होणार भरती

पुण्यभूमी प्रतिनिधी



मुंबई:पशुसंवर्धन विभाग सक्षम होण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी मोठ्या जोमाने कामाला सुरुवात केली आहे. पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदांपाठोपाठ आता सहायक आयुक्त, पशुसंवर्धन या ही पदे भरण्याचा निर्णय घेतला असून या पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) जाहिरात प्रसिद्ध करून प्रक्रिया सुरू केली आहे.पशुसंवर्धन विभागाचे काम पूर्ण क्षमतेने करण्यासाठी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी एकापाठोपाठ एक असे महत्वाचे निर्णय घेण्याचा धडाका लावला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली.

विभागातील रिक्त पदांमुळे नागरिकांना विशेषतः पशुपालक, शेतकरी यांना सेवा देण्यास येणारी अडचण लक्षात घेऊन विभागातील आवश्यक पदे भरण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी त्यांनी पशुसंवर्धन सेवा गट अ मधील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदे भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणी पत्र सादर केले. त्यानंतर आता प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करून महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा पान २ वर

**कामास येणार गती...**

ही भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून पशुसंवर्धन विभागाला सक्षम आणि नवीन अभ्यासू अधिकारी मिळणार आहेत. त्यातून ग्रामीण भागातील पशुसंवर्धन विभागाचे काम आणखी वेगाने व पूर्ण क्षमतेने होण्यास मदत होणार असून पशुपालकांना चांगल्या दर्जाची सेवा मिळणार असल्याचे मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले.

## शासकीय ठिकाणी महिलांची कुचंबना

### आक्रमक:जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:समाजवादी पक्ष महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सालेहा जीलानी शेख यांची जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे मागणी बीड –एम एन सी न्यूज नेटवर्क: बीड जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालय, पंचायत समिती, पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय,त्याचप्रमाणे जिल्ह्यातील तालुका ठिकाणी सार्वजनिक जागी महिलांच्यासाठी प्रामुख्याने स्वच्छतागृहे जी आहेत, त्याची दुरुस्ती करावी, जिथे नाहीत तिथे नव्याने त्याची उभारणी करावयाची मागणी समाजवादी पक्षाच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सालेहा जिलानी शेख यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदन द्वारे केली आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठ, उद्यान, चौकामध्ये व रस्त्याच्या लगत महिलांसाठी स्वच्छतागृह असणे आवश्यक आहे. मात्र शहरात प्रामुख्याने महिलांसाठी अशी स्वच्छतागृहे नाहीत. शहरातील आणि शहरा बाहेरून येणाऱ्या महिलांसाठी ही सुविधा असणे अत्यंत आवश्यक आहे. जिल्ह्यातील अनेक शासकीय कार्यालयामध्ये प्रामुख्याने जेथे पान २ वर

## सुरनरवाडी सरपंचासह पाच जणांना नोटिसा

### टांगती तलवार:तत्कालीन सरपंचासह अभियंत्यांची धावपळ

पुण्यभूमी प्रतिनिधी

धारूर:तालुक्यातील सुरनरवाडी येथे मागील पाच वर्षाच्या कालावधीत तत्कालीन सरपंच , ग्रामसेवक , शाखा आभियंता यांनी केलेल्या कामांमध्ये गंभीर स्वरूपाची अनियमितता व आर्थिक अपहार दिसून आल्यामुळे संबंधितावर कारवाई करून अहवाल सादर करण्याचे लेखी आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी धारूरच्या गटविकास अधिकारी यांना देण्यात आले होते .त्यानुसार गटविकास अधिकारी यांनी सरपंचासह पाच जणांना नोटीसा देऊन खुलासे मागविण्यात आले आहेत .

तालुक्यातील सुरनरवाडी येथे मागील पाच वर्षाच्या कालावधीत तत्कालीन सरपंच म्हणून लता चंद्रसेन काळे तर ग्रामसेवक श्री चौरे व राठोड होते .या वेळी शाखा अभियंता म्हणून सय्यद यांनी काम पाहीले होते . यांनी गावांमध्ये पंधरा व्या वित्त आयोग, राष्ट्रीय रोजगार हमी योजना तसेच २५ – १५ च्या कामाची पान २ वर

> सुरनरवाडी येथील सरपंचासह अभियंता ग्रामसेवक यांनी शासनाच्या आलेल्या निधीचा अपहार केल्याचे चौकशीत समोर आले आहे .जि प चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार संबंधितांना नोटीसा देऊन दहा दिवसाच्या आत खुलासा मागविण्यात आला आहे .नोटीसा देऊन पाच ते सहा दिवसाचा कालावधी झाला आहे .वेळेत खुलासा न प्राप्त झाल्यास वरिष्ठांना कारवाई साठी अहवाल सादर करण्यात येणार आहे .
>
> –वैजनाथ लोखंडे , गटविकास अधिकारी धारूर

## कंत्राटी पद्धतीने होणार पदभरती

### आवाहन:आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदभरती

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचे कार्यालयासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठी जाहिरात व विहीत केलेला अर्जाचा नमूना या कार्यालयाचे वेबसाईट्ु.लशशव.पळल.ळप वर दि.२१.०५.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या कंत्राटी पदासाठी उमेदवाराने आपला विहीत नमून्यातील अर्ज –४ साईजच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखित – हस्तलिखित करुन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड–४३११२२ या पत्यावर दिनांक २३ मे, २०२५ रोजीपासून ते दि. ०५ जून, २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत विहीत नमून्यात अर्ज पोहोचेल अशा रितीने पोस्टाद्वारे किंवा आवक जावक पान २ वर

## रिपाइंकडून देशभर भारत जिंदाबाद यात्राचे आयोजन

### धोरण:मंत्री रामदास आठवले यांची घोषणा

पुण्यभूमी प्रतिनिधी



मुंबई:जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे निरपराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून २८ जणांची क्रूर हत्या केली. या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिंदूर ऑपरेशन करून पाकव्याप्त काश्मीर मधील दहशतवाद्यांची ठिकाणे उध्वस्त करून १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केल्या प्रमाणे नेमके हेरुन दहशतवादी ठिकाणे उध्वस्त केली.

दहशतवाद्यांना धडा शिकवला. भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखवून देशाचे संरक्षण करून शत्रू राष्ट्र पाकिस्तानला चांगलाच धडा शिकवला. भारताचे दहशतवादाविरुद्ध युद्ध कायम राहील. भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी पाकिस्तानला आणि दहशतवाद्यांना चांगला धडा शिकवला याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे अभिनंदन करणारी; दहशतवादाला पान २ वर


# भारत–पाकमध्येच शस्त्रसंधी

### अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा शस्त्रसंधीशी संबंध नाही : मिस्री

### तुर्कीसोबतचे तणावपूर्ण संबंध

### स्थायी समितीसमोर महत्त्वाची माहिती सादर

### पाकिस्तानने अणवस्त्र हल्ल्याची धमकी दिली



दिल्ली : वृत्तसंस्था

शस्त्रसंधीचा करार हा फक्त भारत आणि पाकिस्तानमध्येच झालेला आहे. या शस्त्रसंधीशी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा संबंध नाही, असे म्हणत ट्रम्प यांनी भारत–पाकिस्तान यांच्यातील शस्त्रसंधीबद्दल केलेला दावा परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी फेटाळून लावला.

भारत–पाकिस्तानमधील शस्त्रसंधी, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा शस्त्रसंधीतील सहभागी, तुर्कीसोबतचे तणावपूर्ण संबंध यासह इतर मुद्यांवर भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी संसदेच्या स्थायी समितीसमोर महत्त्वाची माहिती सादर केली.

**दहशतवादी पाकमध्ये खुलेआम फिरतात**

संयुक्त राष्ट्राने घोषित केलेले दहशतवादी खुलेआम पाकिस्तानमध्ये फिरत आहेत. भारतविरुद्ध सातत्याने दहशतवादी कारवाया करत आहेत. पहलगाम हल्ल्यातील तपासातून पुढे आलेल्या माहितीनुसार दहशतवाद्यांनी पाकिस्तानमध्ये बसलेल्या त्यांच्या आकासोबत संपर्क केला होता, असेही मिस्री म्हणाले.

संसदेच्या स्थायी समितीची परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीत मिस्री यांनी शस्त्रसंधीबद्दल अनेक मुद्दे अधोरेखित केले. यावेळी पाकिस्तानने अणवस्त्र हल्ल्याची धमकी दिली होती का, यावर उत्तर देताना भारताने पाकिस्तानच्या कुठल्याही अण्वस्त्र तळावर हल्ला केला नाही आणि पाकिस्तानने अण्वस्त्र हल्ल्याची भारताला कसलीही धमकी दिली नव्हती, असेही मिस्री म्हणाले. ऑपरेशन सिंदूरनंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध हे पारंपरिक युद्ध होते. त्यामध्ये कुठल्याही अण्वस्त्र युद्धाची धमकी देण्यात आली नव्हती, असे ते म्हणाले.

## गोळीबार प्रकरणात आरोपीस जामीन

### ॲड.अविनाश गंडले: बीड शहरातली घटना

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, दिनांक १३/१२/२०२४ रोजी रात्री दोन वाजण्याच्या सुमारास फिर्यादी अभिषेक विश्वास डोंगरे याच्या घरी अक्षय आठवले, मनिष क्षीरसागर, आशिष आठवले, प्रसाद धिवार असे गेले होते. त्यांच्या हातात पिस्टल होते व प्रसाद धिवार हा घर दाखवत होता, अशा प्रकारची फिर्याद फिर्यादीने पेठ बीड पोलीस स्टेशन येथे दिली होती. त्यामध्ये दिनांक १९/०६/२०२४ रोजी प्रसाद धिवार सोबत झालेल्या भांडणाचे कारण काढुन दिनांक १३/१२/२०२४ रोजी घरावर गोळीबार केला अशा प्रकारची फिर्याद दिली होती. सदरील आरोपींवर मोक्का लावण्यात आला होता. यामधील आरोपी प्रसाद धिवार यांचा मोक्का कमी करण्यात आला.

आरोपी प्रसाद धिवार याचेवर कलम १०९, १९१ (२), १९१ (३), १९०, ६१ (२), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३३३ बी.एन.एस. नुसार व कलम ३, २५, २७ शस्त्र अधिनियम कायद्या अंतर्गत तसेच कलम १३५ महाराष्ट्र पान २ वर

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

## ज्ञानदीप गमावला

जगप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ आणि विज्ञान लेखक डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांचे वृद्धापकाळाने पुण्यातील निवासस्थानी निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने वैज्ञानिक आणि साहित्यिक जगतात मोठी पोकळी निर्माण झाली असून खगोलशास्त्रातील तेजस्वी तारा निखळल्याची भावना व्यक्त होत आहे. खगोलशास्त्रातील त्यांचे महत्त्वपूर्ण संशोधन आणि विज्ञानाचा सामान्यांपर्यंत प्रसार करण्याचे कार्य कायम स्मरणात राहील. डॉ. नारळीकर हे 'हॉईल–नारळीकर सिद्धांत' मांडणारे एक थोर भौतिकशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जात. ते ब्रह्मांडाच्या स्थिर स्थितीच्या सिद्धांताचे अभ्यासक होते. कोल्हापूर येथे १९ जुलै १९३८ रोजी एका सुशिक्षित कुटुंबात जन्मलेल्या डॉ. नारळीकर यांचे शालेय शिक्षण बनारस येथे झाले. त्यांचे वडील प्रा. विष्णू वासुदेव नारळीकर हे बनारस हिंदू विद्यापीठात गणिताचे विभागप्रमुख होते, तर आई संस्कृत पदवीधर होत्या. लहानपणापासूनच त्यांना गणित आणि विज्ञानाची आवड होती.

१९५९ मध्ये त्यांनी गणित आणि खगोलीय पदार्थविज्ञान विषयात बी.एस्सी पूर्ण केले. उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. तेथे केंब्रिज विद्यापीठातून त्यांनी एम.एस्सी पदवी मिळवली. या विद्यापीठात त्यांनी जगप्रसिद्ध प्राध्यापक फ्रेड्रिक हॉईल यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी केली. वयाच्या २२ व्या वर्षी ते रॉयल अॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे सदस्य बनले. तसेच किंग्ज कॉलेज, केंब्रिजचे फेलो म्हणूनही त्यांची निवड झाली. १९६६ मध्ये त्यांचा विवाह गणितज्ञ मंगला राजवाडे यांच्याशी झाला. मंगला नारळीकर या त्यांच्या वैज्ञानिक आणि साहित्यिक कार्यात सहकारी होत्या. मंगला नारळीकर यांचे २०२३ मध्ये निधन झाले. १९७२ मध्ये जयंत नारळीकर यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेत (टीआयएफआर) प्राध्यापक म्हणून कार्य केले.

१९८८ मध्ये त्यांनी पुण्यात आंतरविद्यापीठीय खगोलशास्त्र आणि खगोल–भौतिकी केंद्र आयुका (आययूसीएए) स्थापन केले. ते २००३ पर्यंत या संस्थेचे संचालक होते. १९९४ ते ९७ दरम्यान ते आंतरराष्ट्रीय खगोलीय संघाच्या कॉस्मॉलॉजी कमिशनचे अध्यक्ष होते. २०२१ मध्ये नाशिक येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले होते. डॉ. नारळीकर यांनी आपल्या संशोधनातून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या पीएच.डी प्रबंधात गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत आणि सृष्टीच्या निर्मितीसारख्या विषयांचा समावेश होता. त्यांनी विश्वाच्या स्थिर स्थितीचा सिद्धांत मांडून खगोलशास्त्राला एक वेगळी दृष्टी दिली. हॉईल यांच्या समवेत त्यांनी गुरुत्वाकर्षणसदृश सिद्धांत सादर केला, ज्यामुळे विशोत्पत्ति शास्त्रात महत्त्वाचे योगदान दिले. डॉ. नारळीकर यांनी विज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मराठी, हिंदी व इंग्रजीमध्ये विपुल लेखन केले. त्यांच्या प्रसिद्ध पुस्तकांमध्ये 'अभयारण्य', 'वामन परत ना आला', 'अंतराळ', 'भस्मासुर', 'व्हायरस', 'चला जाऊ अवकाश सफरीला' यांचा समावेश होता. 'चार नगरात माझे विश्व' आणि 'पाहिलेले देश, भेटलेली माणसे' ही त्यांची आत्मचरित्रे आहेत.

'चार नगरात माझे विश्व' या त्यांच्या आत्मचरित्राला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला तर 'यक्षाची देणगी' या पुस्तकाला महाराष्ट्र सरकारचा पुरस्कार मिळाला. अमेरिकेतील एका संस्थेने त्यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले होते. जनसामान्यांना विज्ञानातील गूढ रहस्ये कळावीत म्हणून डॉ. नारळीकर यांनी प्रामुख्याने मराठी भाषेतून विज्ञान साहित्याची निर्मिती केली. त्यांनी लिहिलेल्या मराठी विज्ञान कथांमुळे लहान मुलांमध्ये विज्ञानाची रुची निर्माण झाली. ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ हॉईल–नारळीकर थिअरी प्रसिद्ध झाली होती. विश्वाची निर्मिती महास्फोटातून झाली की, ते स्थिर स्थितीत आहे. असे दोन मतप्रवाह खगोल व भौतिक तज्ज्ञांमध्ये होते. हॉईल–नारळीकर यांचा सिद्धांत स्थिर स्थिती विश्वाची कास धरणारा होता. डॉ. नारळीकर यांनी वयाच्या २६ व्या वर्षी गुरुत्वाकर्षणासंबंधीचा सिद्धांत मांडला आणि ते स्वतंत्र भारतातील विज्ञान जगताचा चेहरा ठरले. या सिद्धांतातूनच पुढे विश्वनिर्मितीच्या रहस्यावरील संशोधनाला चालना मिळाली. आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवल्यानंतर भारतातील खगोलशास्त्रातील संशोधन आणि लोकप्रियता अधिक उंचावण्यासाठी ते भारतात परतले. डॉ. नारळीकरांच्या अचाट बुद्धिमत्तेची कल्पना असल्याने १९७२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्यांना बोलावून घेतले आणि डॉ. नारळीकर टाटा मूलभूत संशोधन संस्थेमध्ये दाखल झाले. पुण्यात 'आंतरविश्व विद्यापीठ' स्थापन करून राज्यात विज्ञान संशोधनाची भक्कम पायाभरणी त्यांनी केली. डॉ. नारळीकरांनी विज्ञानकथा इतक्या रसाळ भाषेत, सोप्या आणि सुलभरीत्या मांडल्या की, वाचकांना त्याची चटक लागली. विज्ञानाचे महत्त्व आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजावा असाच त्यांचा लेखनामागचा उद्देश होता. त्यांची लेखणी कायम महाराष्ट्राला विज्ञानसाक्षर करण्यासाठी झिजत राहिली. पाश्चात्त्य देशांतील लोकांमध्ये जसा वैज्ञानिक दृष्टिकोन आहे, तसा आपल्याकडील लोकांचा असावा, ही त्यांची प्रांजळ भावना होती. फलज्योतिषाला आव्हान देणारी त्यांची भूमिका होती, ते समाजाला सतत विचार करायला लावणारे व्यक्तिमत्त्व राहिले. युवकांना संशोधनासाठी प्रोत्साहित करण्यासाठी ते कायम कार्यरत असत. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाला डॉ. नारळीकर यांनी कायम सक्रिय पाठबळ दिले होते.

अंनिस, आयुका आणि पुणे विद्यापीठाचा संख्याशास्त्र विभाग यांच्या वतीने फलज्योतिषाची एक शास्त्रीय चाचणी डॉ. नारळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी केली होती. 'हॉईल–नारळीकर सिद्धांता'ने ब्रह्मांडाच्या उत्पत्तीबाबतच्या पारंपरिक संकल्पनांना आव्हान दिले. त्यांचा जीवनप्रवास केवळ प्रयोगशाळेतच नव्हे तर सामान्य जनतेपर्यंत विज्ञान पोहोचवण्याचाही होता. मराठीतून विज्ञानलेखन करून त्यांनी अवघ्या महाराष्ट्राला विज्ञानाकडे बघण्याची नवी दृष्टी दिली. विविध पुस्तकांमधून त्यांनी विज्ञानसाक्षरतेचा संदेश घरोघरी पोहोचवला. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. 'पद्मविभूषण'सह अनेक राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या डॉ. नारळीकर यांच्या जाण्याने विज्ञान आणि साहित्य क्षेत्रात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. भारताच्या या महान वैज्ञानिकास भावपूर्ण श्रद्धांजली.

# लोणारमध्ये काँग्रेसची तिरंगा रॅली

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या आदेशाने व जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष यांच्या सूचनेनुसार आज

तालुका काँग्रेस व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शहरांमधून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली.

पहलगाम येथे पाकिस्तानच्या अतिरेक्यांनी भ्याड हल्ला करून निर्दोष पर्यटकांचा बळी घेतला याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांकडून ऑपरेशन सिंधूर यशस्वीपणे राबविण्यात आले, भारतीय सैनिकांचे मनोबल वाढावे म्हणून काँग्रेस पक्षाच्या वतीने शहरामध्ये तिरंगा रॅली काढण्यात आली. तसेच स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त सदभावना दिन साजरा करण्यात आला, व माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला रॅली ची सुरुवात बस स्टॅन्ड पासून करुन पंचायत समिती स्वातंत्र सैनिकांचा सत्कार करून समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष राजेश मापारी व शहराध्यक्ष शेख समद शेख अहमद यांनी केले होते. यावेळी

### सदभावना दिन:सैनिकांचा यथोचित सन्मान



प्रामुख्याने वसंत बापू देशमुख, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी शांतीलाल गुगलीया, माजी सभापती केशवराव फुके, पंचायत समिती माजी सभापती ज्ञानेश्वर चिभडे, माजी जिल्हा सरचिटणीस साहेबराव पाटोळे, माजी नगराध्यक्ष भूषण मापारी, प्रदीप संचेती सुभाष सोनुने, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष अनिकेत मापारी, विदर्भ अॅक्डमी चे संचालक शेख सर, शालिक घायाळ सरपंच,महिला तालुका अध्यक्ष ज्योती राठोड, माजी शहराध्यक्ष नितीन शिंदे, माजी नगरसेवक शेख रौफ, माजी नगरसेवक रमजान परसुवाले, माजी नगरसेवक सतीश राठोड, माजी नगरसेवक शेख असलम, मजेत कुरेशी, माजी नगरसेवक पंढरी चाटे, शहर उपाध्यक्ष गजानन मापारी, शहर सरचिटणीस शेख अजमत शेख अनामत,ओबीसी सेल शहराध्यक्षअंबादास इंगळे, बळीराम मादनकर युवक काँग्रेस शहराध्यक्ष विकास मोरे तालुका मा. सरपंच अश्रुबा फुके, पंजाबराव पनाड, गणेश घायाळ, शहर सरचिटणीस भवानी मापारी, शेख सज्ञाद शेख करामत, अभिमन्यू वाठोरे, सुरेश वाठोरे, अनंत मोरे बंडू सुलताने, सिद्धू वाकुडकर, शुभम चाटे, हेमंन् शेख असलम, शेख शपिक मोहम्मद हनीफ, सह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी माजी सैनिक कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेश मापारी यांनी तर सूत्रसंचालन प्राध्यापक सुदन कांबळे यांनी केले कार्यक्रमाला पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पान एक वरून

**मंत्री पंकजा मुंडेंनेमुळे**

गट अ या संवर्गातील सहायक आयुक्त, पशुसंवर्धन ही ३११ पदे भरण्याचा निर्णय घेतला आणि तसे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवले. या भरतीची प्रक्रिया वेगाने होण्यासाठी श्रीमती मुंडे यांनी पाठपुरावा केला. एम पी एस सी ने सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन या संवर्गातील ३११ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली असून २० जून २०२५ पर्यंत अर्ज मागविले आहेत.

**शासकीय ठिकाणी महिलांची**

महिलांना कामानिमित्त सारखं यावं लागतं अशा जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, पंचायत समिती आणि याबरोबरच नगरपरिषद यांच्या अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी जी पूर्वीची स्वच्छतागृहे आहेत ती अतिशय दयनीय झाली आहेत. काही ठिकाणी तर स्वच्छतागृहेच नाहीत. त्यामुळे महिलांची मोठी कुचंबना होत आहे. महिलांची ही गैरसोय दूर करावी अशी मागणी समाजातील पक्षाच्या जिल्हाध्यक्ष यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन केली आहे.ग्रामीण भागातून कामानिमित्त बाजारपेठेत किंवा शासकीय कार्यालयात येणाऱ्या शहरातील महिलांना सार्वजनिक ठिकाणी महिला स्वच्छतागृह अभावामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर समाजवादी पार्टी, महाराष्ट्र प्रदेशच्या महिला आघाडी च्या वतीने आवाज उठवण्यात आला आहे. याविषयीचे निवेदन बीडचे जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन तसेच जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी आणि जिल्ह्यातील नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनाही अशी निवेदन देण्यात आली आहेत. लवकरात लवकर स्वच्छतागृहाची उभारणी करावी अन्यथा समाजवादी पार्टीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल. असा इशाराही यावेळी देण्यात आला. निवेदनावर समाजवादी पार्टी महाराष्ट्र प्रदेश सचिव एड. शिवाजी कांबळे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सालेहा जीलानी, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष शेख जीलानी, अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी आदींची नावे आहेत.

**सुरनरवाडी सरपंचासह पाच**

चौकशी करून कारवाईकरण्याची तक्रार आमदार प्रकाश सोळंके यांनी ११ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात आली होती .या तक्रारीवरून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माजलगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली समिती स्थापन करून सुरणवाडी गावात जाऊन १५ वित्त आयोग व रोजगार हमी योजनेच्या कामाची चौकशी केली होती .या समितीने ३१ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषदेला अहवाल सादर केला होता .या अहवालामध्ये गंभीर स्वरूपाच्या आर्थिक अनियमितता व अपहार दिसून आल्याचे नमूद केले होते .त्यामुळे याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दखल घेऊन संबंधित शाखा अभियंता, सरपंच , ग्रामसेवक यांना कारणे दाखवा नोटीस देऊन अंतिम अपहारीत रक्कम निश्चित करून कार्यालयास कळवावी .तसेच जबाबदारी व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र शासन ग्रामीण विकासाच्या शासन परिपत्रक ४ जानेवारी २०१७ नुसार गंभीर स्वरूपाची कारवाई करून अहवाल सादर करण्याचे लेखी आदेश गटविकास अधिकारी यांना देण्यात आले होते .मागील पाच वर्षाच्या कालावधीत शाखा अभियंता सय्यद, सरपंच लता काळे व ग्रामसेवक श्री .चौरे व राठोड यांनी काम पाहिले होते .तसेच प्रशासक म्हणूनही शाखा अभियंता श्री पोळ यांनी काम पाहिले होते .त्यांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात आर्थिक आभार झाल्याचे समोर आले आहे . यामुळे धारूर येथील गटविकास अधिकारी सरपंचासह पाच जणाला नोटीसा देण्यात आल्या आहेत .या नोटीसामध्ये आपणाकडून झालेल्या आर्थिक भारत संदर्भात आपली काय म्हणणे आहे यासाठी खुलासा मागविण्यात आला आहे .गटविकास अधिकारी यांनी देण्यात आलेल्या नोटीसामुळे तत्कालीन सरपंच ,ग्रामसेवक व शाखा अभियंत्यांची धावपळ सुरू झाली आहे .गावाच्या विकासासाठी आलेला निधी सर्वांनी संगणमत करून त्याची कशी विल्हेवाट लावल्याची बाब समोर आली आहे .आता यासंदर्भात धारूरचे गटविकास अधिकारी काय कारवाई करणार याकडे लक्ष लागले आहे .

**कंत्राटी पद्धतीने होणार**

शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे समक्ष सादर करावेत. या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) प्राप्त झालेल्या विहीत नमुन्यातील अर्जाचा विचार करण्यात येईल. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या कंत्राटी पदासाठी शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी, पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन) अशी आहे. तसेच प्राप्त अर्जांच्या छाननीनंतर भरती प्रक्रियेसंदर्भात पुढील माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळ ,. लशशव.पळल.ळप वर प्रसिद्ध करण्यात येईल. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पार पाडली जाणार आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.

**रिपाइंकडून देशभर भारत जिंदाबाद**

पोसणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी भारतीय सैन्याने हाती घेतलेल्या सिंदूर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षातर्फे देशभर भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात येणार असल्याची घोषणा बुधवार (दि.२१) रोजी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी मुंबईत प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सिंदूर ऑपरेशन यशस्वी करून आपले खंबीर नेतृत्व सिद्ध केले. भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान आहे. भारताचे वायुदल नौदल आणि भूदल यांनी उत्कृष्ट कामगिरी अतुलनीय शौर्य दाखविले. आपल्या भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान असल्याचे प्रतीक म्हणून भारत जिंदाबाद यात्रा रिपब्लिकन पक्ष देशभर काढणार आहे. अशी माहिती ना. रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत दिली. सर्व रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी ही भारत जिंदाबाद यात्रा आप आपल्या भागात यशस्वी करावी. रिपब्लिकन पक्षाने आयोजित केलेल्या या भारत जिंदाबाद यात्रेत सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन ना. रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे, मुंबई विभागाचे सिध्दार्थ कासारे यांनी केले आहे.

**गोळीबार प्रकरणात आरोपीस**

पोलीस अधिनियम नुसार गुन्हा नोंद करण्यात आला होता. आरोपी तर्फे प्रसिध्द विधिज्ञ ड. अविनाश पं. गंडले यांच्या मार्फत जामीन दाखल करण्यात आला होता. आरोपीचे वतीने ड. अविनाश पं. गंडले यांनी केलेला प्रभावी व अभ्यासपुर्ण युक्तीवाद ग्राह्य धरुन मा. १ ले जिल्हा व सत्र न्यायाधिश बीड यांनी जामीन मंजुर केला. सदरील प्रकरणाकडे संपुर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेले होते. आरोपी तर्फे ड. अविनाश पं. गंडले यांनी काम पाहिले, त्यांना याकामी ड. इम्रान ए. पटेल, ड. सुरक्षा जावळे, ड. बप्पा माने, ड. के.डी. मस्के, ड. राजेश बी. शिंदे, ड. एस.जे. गिरी, ड. शुभम सरवदे, यांनी सहकार्य केले.

# अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## कारवाई: सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:तालुक्यातील कोळगाव ते पाडळशिंगी रस्त्यावरील हॉटेल दिव्या गार्डनच्या मागील खोलीत तिरट जुगार खेळणाऱ्या सहा जणांवर चकलांबा पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. २० मे रोजी दुपारी २:३० वाजता गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या या कारवाईत १,५१,०४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, सहा जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्याच्या कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस उपनिरीक्षक पवनसिंग जंघाळे यांच्या , पोलीस हवालदार राम बारगजे, पोलीस कॉन्स्टेबल घोंगडे यांनी ही कारवाई केली. छाप्यात अमोल लोंढे, अशोक करांडे, व्यंकटेश काळे, शिवाजी जाधव, भारत गुजर आणि कृष्णा माळी हे जुगार खेळताना आढळले. त्यांच्याकडून रोख रक्कम, तिरट जुगाराचे ३४ पत्ते आणि चार मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. जप्त केलेल्या मुद्देमालात २५,७०० ते ५०,७०० रुपये किमतीचा माल प्रत्येक आरोपीकडून मिळाला. पोलिसांनी पंचनामा करून सर्व मुद्देमाल ताब्यात घेतला. पोलीस हवालदार राम बारगजे हे पुढील तपास करत आहेत.

# जातीवाचक शिवीगाळ करून काठीने डोके फोडले

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज : शेतातील आंबे चोरी केल्याचा आळ घेत आमच्या समोर ऊर काढून तुम्ही का वागता ? असे म्हणून एका तरुणाला जातीवाचक शिवीगाळ करून काठीने मारहाण करून डोके फोडल्याचा प्रकार केज तालुक्यात घडला आहे. या प्रकरणी दोघा विरुद्ध ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.केज तालुक्यातील टाकळी गावात दि. २० मे रोजी विक्रम उत्तम सिरसट हे दुपारी १:३० वा. च्या सुमारास एका कार्यक्रमा निमित्त शेतात जेवण्यासाठी जात असताना ते एका टपरी जवळ असताना त्या ठिकाणी भास्कर विठ्ठल घुले व त्यांचा पुतण्या ऋषीकेश घुले हे त्याच्या जवळ आले आणि विक्रम सिरसट याच्यावर त्याने शेतातील आंबे तोडून आणल्याचा आरोप करीत जातीवाचक शिवीगाळ केली. तसेच तुम्ही हलक्या जातीचे आहात. आमच्या समोर छाती काढून चालता. असे म्हणून हातातील काठीने हात, पाय आणि कमरेवर मारून जखमी केले तसेच डोक्यात काठी मारून डोके फोडले. या प्रकरणी विक्रम सिरसट याच्या तक्रारी वरून केज पोलीस ठाण्यात भास्कर विठ्ठल घुले आणि ऋषीकेश घुले याच्या विरुद्धगुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी सहाय्यक पोलिस अधीक्षक कमलेश मीना हे तपास करीत आहेत.

## पान सहा वरून

**बीडमध्ये काँग्रेसची तिरंगा**

जाधव, गणेश राउत, विष्णू मस्के, प्रकाश मुंडे, पांडुरंग मस्के, दादासाहेब तासतोडे, राहुल जाधव, ड. विशाल मस्के, रमधन जमाले, मोसिन शेख, गणेश जवकर, कल्याण टेकाळे, हनुमंत घोडके, शेख कादर बाबा, उत्तरेश्वर जाधव, बबलू भाई शेख, रोहित नवले, राम शेळके, हरिभाऊ सावंत, पांडुरंग हराळे, सखाराम बेंडगे, रंजीत शेळके, अमजत कुरेश, शेख मुस्ताक, बाळू गिराम यांच्यासह या रॅलीत बीड शहर मंचचे नितीन जायभाये, बाजीराव ढाकणे, डॉ. संजय तांदळे, अड. नितीन वाघमारे यांनी देखील उपस्थित राहून भारतीय सैनिकांप्रती आपल्या संवेदना दर्शवल्या.

**शैक्षणिक यशाची ग्रामस्थांकडून**

देखील गावकऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी ज्ञानोबा आगळे,बिभीषण कोकाटे,नानासाहेब साळुंखे,जयपाल राऊत,व्यंकट साळुंखे,सुहास राऊत,प्रेम पुंड,अमृत टेकाळे,बालाजी आल्टे,विलास नाडे,नारायण गवळी,बबन टिंगरे, सल्लाउद्दीन बेग,सचिन टेकाळे तसेच गावातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

**केजमध्ये भ्रष्टाचाराचे साचले**

हादगाव रोडवर किलोमीटर अंतरावर कोट्यवधी रुपयांचे बजेट टाकले आहे परंतु आमदारा नमीता लोखंडे यांनी कुठल्या घशात घातले आहे याचा पत्ता नाही आमदारा असावा पन एवढे जनतेचे हाल होत असताना निच पनाचा कळस बनुन राहणारा नसावा असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**महामार्गाच्या कामासाठी**

झाडांचे अवशेष पडलेले आहेत. या रस्त्यावरील वटवृक्ष नामशेष झाले असून त्यांना पुर्नरजीवीत करता आले असते. परंतु याकडे कोणी लक्ष दिले नाही. मागील काही वर्षापूर्वी लातूरमध्ये वटवृक्षाचे पुनर्रोपण करण्याचा प्रयोग यशस्वी झाला होता. असाच उपक्रम करून अनेक वृक्षांचे संगोपन करता आले असते. या रस्त्यावर सध्या कुठल्याही प्रकारचे वृक्ष शिल्लक राहिले नसून रस्ता ओसाड दिसून येत आहे. पर्यावरण संवर्धनासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूने वृक्ष लागवड करण्याची गरज असून वृक्ष लागवडीसाठी राष्ट्रीय महामार्गाचे काम करणारी एजन्सी पुढाकार घेणार का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आता पावसाळा तोंडावर येऊन ठेपला असून वृक्ष लागवड करण्याची मागणी निसर्गप्रेमीतून होत असून या रस्त्यावर वृक्ष लागवडीसाठी सामाजिक वनीकरण विभागाने पुढे येण्याची गरज आहे.

**परळी आगारात नव्या दहा**

मारला. यावेळी अजयजी मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. विनोद जगतकर, बालाजी उर्फ पिंटू मुंडे, सुरेश टाक, के डी उपाडे, एजाज शेख, अनंत इंगळे, नितीन कुलकर्णी, शंकर कापसे, वसंत तिडके, संजय आघाव, सय्यद सिराज, दीपक तांदळे, रवी मुळे, अविनाश गवळी, सय्यद मुसा, रवी आघाव, महेंद्र रोडे, दत्ताभाऊ सावंत, गिरीश भोसले, गणेश सुरवसे, यांसह पदाधिकारी तसेच परळी आगाराचे अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते.

**अरुणा मिटकरी हिचा**

कळंब येथे झाले होते तेव्हा पासूनच महाराष्ट्र लोकसेवा आयोग परिक्षेची तयारी करीत होती आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली आणि तीला हे यश प्राप्त करता आले म्हणून कन्हेरवाडी ग्रामस्थांच्या वतीने सोमवार दिनांक १९ मे रोजी शाल,श्रीफळ,बुके आणि पेढे भरवुन जंगी सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी सरपंच ड रामराजे जाधव,उपसरपंच विजय उर्फ सोनू कवडे,पत्रकार रामराजे जगताप,विक्रम विजयराव कवडे,अजय कवडे,उमेश गायकवाड, शरद कवडे,नेताजी सुब्राव कवडे,अनंत पाटील,विलास कमलाकर कवडे,दत्तात्रय मिटकरी यांच्यासह ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**गेवराईचे गट शिक्षणाधिकारी**

रक्कम कोणत्याही शाळेला वर्ग न करताच, संपूर्ण रक्कम उचलली असल्याची चर्चा आहे. त्यासाठी, त्यांनी शिक्षण विभागाच्या काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरून, घर घर संविधान दिन उत्सवाची रक्कम कागदोपत्री नोंद करून उचलली आहे. दरम्यान, गेवराई शिक्षण विभागाचे गट शिक्षण अधिकारी हे पंचायत समितीच्या सभागृहातील त्यांच्या कार्यालयात न येता , कस्तुरबा गांधी बालिका शाळेत बसून कारभार हाकतात. शासकीय कामाच्या निमित्ताने आलेल्या पालकांना, शिक्षण विभागाच्या कर्मचाऱ्यांना ते भेटत नाहीत. पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील त्यांची खूर्ची रिकामीच असते. गट शिक्षण अधिकारी गेवराई तालुक्यातील शिक्षण विभागाचा कारभार कोणत्या धुंदीत चालवतात ? असा प्रश्न उपस्थित झाला असून, कोणताही उपक्रम न घेता, कागदोपत्रीच अभियान राबवून ; आलेला संपूर्ण निधी हडप केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असून, गेवराई चे गट शिक्षण अधिकारी स्वतःच कंत्राटदार झाल्याची चर्चा आहे. या संदर्भात, शिक्षण विभागाच्या उपसंचालक डॉ. माधुरी सावरकर यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.

**सहाय्यक अभियंता पदावर**

वीरेंद्र शिंपी यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी प्रभारी उपकार्यकारी अभियंता अभिजीत राठोड यांनी अमृता लखापती यांना शुभेच्छा दिल्या. त्याच बरोबर बुधवारी (दि.२१) तेली समाजाच्या वतीने अमृता लखापती यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. यावेळी कोलूघाणा सोसायटीचे उपाध्यक्ष सुर्यकांत व्यवहारे, संचालक संगमेश्वर फुटके,प्रा मधुकर शिंदे, छगन आप्पा क्षीरसागर, प्रा प्रविण फुटके, शिवरुद्र क्षीरसागर आदि उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



श्री उमामहेश्वर मंदिर विश्वस्त मंडळ व व्यवस्थापक, आदिमाया प्रतिष्ठान स्वामी भक्त परिवार, नादब्रह्म ढोल-ताशा ध्वज पथक ट्रस्ट आणि सर्व वादक मित्रपरिवार यांच्यातर्फे शुक्रवार पेठेतील दोनशे वर्षांहून अधिक पुरातन असलेल्या श्री उमा महेश्वर मंदिरात वासंतिक चंदन उटी सोहळा आयोजित करण्यात आला. (छाया : मंदार टण्णू)

## वेचक

### 'समाजासाठी वेळ देणे हे सर्वश्रेष्ठ दान'

**पुणे:** भारतीय संस्कृतीमध्ये दानाला विशेष महत्त्व असून रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते; परंतु समाजाच्या सर्वांगीण उत्थानासाठी वेळ देणे हे रक्तदानासह सर्वश्रेष्ठ दान आहे, असे मत परम विशिष्ट सेवा मेडल विजेते निवृत्त लेफ्टनंट जनरल सुदर्शन हसबनीस यांनी व्यक्त केले. कै. कृ. ब. उर्फ अण्णा तळवलकर मेमोरियल ट्रस्टतर्फे १८ व्या वार्षिक पुरस्कारांचे वितरण परम विशिष्ट सेवा मेडल विजेते निवृत्त लेफ्टनंट जनरल सुदर्शन हसबनीस यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी यंदाचा समाजशिक्षक पुरस्कार ज्ञान प्रबोधिनी मानसशास्त्र संस्थेच्या संचालक आणि ज्येष्ठ मानसशास्त्र संशोधिका डॉ. अनघा लवळेकर यांना, तर अनुकरणीय उद्योजक पुरस्कार कंझ्युमर शॉपी या व्यवसाय प्रदर्शनांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणाऱ्या मीनल मोहाडीकर यांना प्रदान करण्यात आला. प्रत्येकी रुपये ४० हजार आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

### युवासेना जिल्हाप्रमुखांच्या गाडीवर गोळीबार

**पुणे :** पुणे शहराच्या मध्यवर्ती आणि वर्दळीच्या भागात घडलेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे पुणे हादरले आहे. शिवसेना (शिंदे गट) युवासेना जिल्हाप्रमुख निलेश राजेंद्र घारे यांच्या वाहनावर वारजे





माळवाडी परिसरात गोळीबार करण्यात आला आहे. गाडीच्या काचा फुटल्या असून सुदैवाने घारे यावेळी गाडीत उपस्थित नव्हते. त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. ही धक्कादायक घटना सोमवारी सायंकाळी घडली. दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात हल्लेखोरांनी घारे यांच्या गाडीवर गोळीबार करून घटनेनंतर पसार झाले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलीस सध्या या दोघा हल्लेखोरांचा शोध घेण्याचे काम युद्धपातळीवर करत आहेत. निलेश घारे यांचे जनसंपर्क कार्यालय वारजे माळवाडीतील गणपती माथा परिसरात आहे. घटनास्थळी त्यावेळी घारे आपल्या सहकाऱ्यांना भेटण्यासाठी आले होते; परंतु ते गाडीत नसल्यामुळे त्यांच्या जीवाला धोका टळला. पोलिसांनी या घटनेची तातडीने दखल घेत तपास सुरू केला आहे.

### पुण्यातही आढळला कोरोनाचा रुग्ण !

**पुणे :** मुंबईनंतर आता पुण्यातही कोरोनाचा रुग्ण आढळून आला आहे. पुण्यातील एका रुग्णालयात उपचार घेणाऱ्या ८७ वर्षांच्या पुरुष व्यक्तीला कोरोनाची लागण झाली आहे. या वर्षात पुण्यात



आढळून आलेला हा पहिलाच कोरोनाचा रुग्ण आहे. पुण्यात कोरोनाची लागण झाल्याने आरोग्य विभागाकडून आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक ती काळजी घेण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. मात्र, कोणीही घाबरून जाऊ नये असेही आरोग्य विभागाने म्हटले आहे. पण राज्यात अद्याप आरोग्य मंत्रालयाकडून रुग्ण संख्या, त्यांची स्थिती आणि नियमावलीबाबत अधिकृतरित्या कुठलीही भूमिका मांडण्यात आलेली नाही. दरम्यान, गेल्या काही दिवसांमध्ये दक्षिण-पूर्व आशियातील देशांमधे कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याच्या बातम्या येत आहेत. आशिया खंडातील सिंगापूर, हाँगकाँग, चीन आणि थायलंडमध्ये कोरोनाच्या जेएन-१ व्हेरियंटचे रुग्ण वाढू लागल्याने सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे. मूळ ओमिक्रॉनचा सब व्हेरियंट असलेल्या जेएन-१ आणि त्याचा सब व्हेरियंट एनबी-१.८ मुळ संसर्ग वाढल्याचे दिसून येते. हे नवे व्हेरियंट भारतातही लागण झालेल्या रुग्णांमध्ये आढळून आले आहेत. हे फारसे घातक नसल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

### पालिका पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड पालिका सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी येथे मोठ्या उत्साहात पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष शशिकांत उर्फ बबनराव झिंजुर्डे यांच्या अध्यक्षेतेखाली संपन्न झाली. या वार्षिक सर्वसाधारण सभेस प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप उपस्थित होते. शशिकांत उर्फ बबनराव झिंजुर्डे यांच्या अध्येक्षतेखाली संस्थेचे संचालक मंडळ व सल्लागार मंडळ यांच्या उपस्थित पार पडली या सभेला मोठ्या प्रमाणावर सभासद उपस्थित होते. अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे सर्व विषय सचिव योगेश रानवडे यांनी वाचून दाखविले व सदर सर्व विषयांस सभेस उपस्थित सभासदांनी बहुमताने व एकविचाराने मंजुरी दिलेली आहे.

# नीरा खोऱ्यातील भाटघर धरणाने गाठला तळ!


## धरणात उर्वरित ८ टक्के पाणीसाठा शिल्लक

◆ पुणे (प्रतिनिधी) :

पुणे जिल्ह्यात गेल्या तीन महिन्यांपासून धरणातून सतत पाण्याचा विसर्ग होत असल्याने आणि यंदा उन्हाळी आवर्तन सोडण्यात आल्याने पाणीसाठा झपाट्याने कमी झाला आहे. यामुळे धरणाचे बुडीत क्षेत्र कोरडे पडत असून, पाणीटंचाईचे संकट गडद होत आहे.

नीरा खोऱ्यातील ब्रिटिशकालीन भाटघर धरणातील पाणीसाठा केवळ ८ टक्क्यांवर आला आहे. नीरा खोऱ्यातील भाटघर धरण हे पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांतील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रमुख आधार आहे. २४ टीएमसी (हजार दशलक्ष घनफूट) पाणी साठवण क्षमता असलेल्या या धरणातून भोर, खंडाळा, पुरंदर, बारामती, इंदापूर आणि फलटण तालुक्यांसह सोलापूर जिल्ह्यातील काही भागांना पाणीपुरवठा होतो. मात्र, गेल्या तीन महिन्यांपासून धरणातून सतत पाण्याचा विसर्ग होत असल्याने पाण्याची पातळी झपाट्याने खालावली आहे.

यंदाच्या उन्हाळी आवर्तनामुळे पाणीसाठा आणखी कमी झाला असून, धरणाने तळ गाठला आहे. धरण परिसरातील अनेक विहिरींनीही तळ गाठला असून, गावांना पाणीटंचाई जाणवू लागली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी याबाबत चिंता व्यक्त केली असून, पुढील काळात पाणीटंचाई टाळण्यासाठी योग्य नियोजनाची मागणी केली आहे. तसेच पाणीटंचाईच्या संकटाला तोंड देण्यासाठी स्थानिक प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. धरणातील पाण्याचा कार्यक्षम वापर, पाणलोट क्षेत्राचा विकास आणि पावसाच्या पाण्याचा संचय यासारख्या उपाययोजनांमुळे पाणीटंचाईवर मात करता येऊ शकते.




### 'पाणीटंचाई टाळण्यासाठी उपाययोजना करा'

भाटघर धरणावर अवलंबून असलेल्या तालुक्यांमध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. धरणातील पाण्याचा तुटवडा शेतीसाठी धोकादायक ठरू शकतो. विशेषतः खरीप आणि रब्बी हंगामासाठी पाण्याची गरज असते. जर पावसाळा वेळेवर दाखल झाला नाही, तर या भागात पाणीटंचाईचे संकट गंभीर रूप धारण करू शकते. धरण परिसरातील गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनत आहे. विहिरी कोरड्या पडल्याने गावकऱ्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांनी पाणीटंचाई टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

### पाणी नियोजनाची गरज

धरणातील पाणीसाठा कमी होत असताना, पाण्याचे योग्य नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. स्थानिक प्रशासनाने पाणीवापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यासाठी पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

#### नियमांचे पालन न केल्यास होणार दंडात्मक कारवाई

## सिंहगड संवर्धनासाठी नवीन 'नियमावली'


◆ पुणे (प्रतिनिधी) :

सिंहगड किल्ला हा पर्यटक आणि शिवप्रेमींच्या आकर्षणाचे केंद्र आहे. त्यामुळे येथे नेहमीच मोठी गर्दी होत असते. पावसाळा सुरू झाल्यानंतर या किल्ल्यावर पर्यटकांची वर्दळ वाढते. जूनपासून येथे पर्यटनाचा हंगाम सुरू होत असून यंदा पर्यटकांसाठी काही नवीन नियम लागू करण्यात आले आहेत. वनविभागाने १ जून २०२५ पासून सिंहगडावर जाणाऱ्यांसाठी नवीन नियमावली जाहीर केली आहे. या नियमांचे पालन न केल्यास कडक दंडात्मक कारवाई होणार आहे.

तसेच गडावर प्लास्टिक बंदी लागू करण्यात आली आहे. पुणे जिल्हा प्रशासनाने नुकत्याच झालेल्या बैठकीत प्लास्टिक बंदीचा प्रस्ताव मांडला होता. त्यानुसार, वनविभागाने हा निर्णय घेतला असून १ जूनपासून प्लास्टिक बंदी काटेकोरपणे लागू होईल. पर्यटकांना आता येथे प्लास्टिकच्या बाटल्यांसाठी अनामत रक्कम (डिपॉझिट) भरावी लागेल. गडावरून परतताना ती परत दिली जाईल.

गडावर कोणी प्लास्टिकचा कचरा फेकला, तर त्यांच्याकडून दंड वसूल केला जाणार आहे. त्याचप्रमाणे वनविभागाचे सहायक वनसंरक्षक दीपक पवार यांनी रविवारी सिंहगडावरील विक्रेत्यांची बैठक घेतली. विक्रेत्यांना पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याचे आणि प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत तसेच विक्रेत्यांना प्लास्टिक बंदीच्या नियोजनासाठी ८ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

या नव्या नियमांमुळे सिंहगडावरील स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाला चालना मिळेल अशी अपेक्षा वनविभागाकडून व्यक्त केली जात आहे. तर अतिक्रमण हटवल्याने किल्ल्याचे ऐतिहासिक आणि नैसर्गिक सौंदर्य टिकून राहील



### अतिक्रमणमुक्त किल्ल्यांचा संकल्प

पुणे जिल्हा प्रशासनाने सिंहगडासह सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी वनविभाग आणि पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन अतिक्रमण हटवण्याच्या सूचना दिल्या आहेत. बेकायदा बांधकाम करणाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या असून अतिक्रमण काढण्याची प्रक्रिया वेगाने सुरु आहे.

## सांगवी येथील नालेसफाईची कामे प्रगतिपथावर

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

जुनी सांगवी, पिंपळे निलख येथे आरोग्य विभागाकडून पावसाळापूर्व नालेसफाईची कामे करण्यात येत आहे. तुंबलेल्या नाल्यांमधून गाळ व कचरा काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

महापालिकेच्या 'ह' क्षेत्रिय अधिकारी पूजा दुधनाळे यांच्या मार्गदर्शनाखाली जुनी सांगवीमध्ये पवना नदीला जोडलेल्या नाल्याची यांत्रिक पद्धतीने व मनुष्यबळाच्या साहाय्याने नालेसफाई केली जात आहे. सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, मुख्य आरोग्य निरीक्षक, उद्धव डवरी, आरोग्य निरीक्षक संदीप राठोड, मुकादम वैशाली रणपिसे यांच्या देखरेखीखाली कर्मचारी सागर भांडे, बंडू जाधव, महादू जाधव, नीलेश जाधव, दशरथ नारसिंगे, ऋषिकेश भिंगारदिवे, विजय जगताप, शिरीष कोकाटे हे काम करत आहेत.

पिंपळे निलख येथे एकूण पाच नाले आहेत. 'ड' क्षत्रिय कार्यालय अंतर्गत आरोग्य विभागाच्यावतीने वॉर्ड क्रमांक २६ वेणूनगर, विशालनगर, डायनेस्टिक सोसायटी ते अण्णाभाऊ साठेनगर, गणेश कस्पटे यांच्या घरापासून मुळा नदीपर्यंत, इंगवले वीटभट्टी ते मुळानदीपर्यंत, रत्ना टॉवर ते मुळा नदीपर्यंत, मिडोरी टॉवर ते मुळा नदीपर्यंत नाल्याच्या चारीही बाजूने उंच भिंती असल्यामुळे मनुष्यबळाच्या साहाय्याने व आवश्यक ठिकाणी यंत्राच्या मदतीने नालेसफाई केली जात आहे. त्यात कनिष्ठ अभियंता अविनाश चव्हाण, सहाय्यक आरोग्य अधिकारी शांताराम माने, मुख्य आरोग्य निरीक्षक योगेश फल्ले, शंकर घाटे ,आरोग्य निरीक्षक खंडेराव बैलकवाड, आरोग्य सहाय्यक सिकंदर तामचीकर, मुकादम रवी बहोत, प्रमोद अंदे, अजय अमोल आदींकडून योगदान दिले जात आहे.

## शहरातील उड्डाणपुलांखालील पार्किंग बंद?

◆ पुणे (प्रतिनिधी) :

शहरात काही नागरिकांनी केलेल्या तोंडी तक्रारीमुळे धायरी फाटा पुलाखालील वाहनतळ बंद केला आहे. भविष्यात शहरात असणाऱ्या उड्डाणपुलाखालील वाहनतळाबाबत तक्रारी आल्यास पुलाखालील वाहनतळ बंद करण्याबाबत विचार केला जाईल, असे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले असून त्यामुळे शहरातील इतर पुलाखालील वाहनतळ देखील बंद होण्याची शक्यता आहे.

पुण्यात मोठ्या प्रमाणात वाहनांची संख्या आहेत. त्यामुळे वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला आहे. शहरातील सर्व प्रमुख रस्त्यावर तसेच अंतर्गत भागात वाहतूककोंडी ही नित्याचीच झाली आहे. त्यात वाहने उभी करण्यासाठी जागा नसल्याने रस्त्याच्या दुतर्फा पार्किंग, नो पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र

शहरात महापालिकेने तब्बल



१८ उड्डाणपूल बांधले आहेत. यातील काही पुलाखाली वाहने उभी करण्यास परवानगी महापालिकेने दिली आहे. काही पुलाखाली चारचाकी तर काही ठिकाणी दुचाकी वाहने लावली जातात. पुलाखाली वाहने लावण्यामुळे रस्ते रिकामे राहून वाहतूक वेगाने होते.

धायरी फाटा येथील स्वर्गीय आमदार रमेश वांजळे उड्डाणपुलाखाली देखील काही वर्षांपासून दुचाकी पार्किंग करण्यास पालिकेने परवानगी दिली होती. या पुलाखाली नागरिक आपली वाहने उभी करत होती. तसेच, हिंजवडी आयटी पार्कसह अन्य ठिकाणी कामाला जाणारे नागरिक देखील येथे त्यांची वाहने लावून आपल्या कामाला जातात.

दरम्यान, या पुलाखाली वाहने लावण्यास परवानगी देऊ नये, या बाबत काही स्थानिक नागरिकांनी पालिकेच्या पथ विभागाकडे तक्रार केली होती. त्यानुसार महापालिकेने कोणताही विचार न करता या पुलाखाली वाहने लावण्यास मनाई केली आहे. त्यामुळे आता आम्ही वाहने कोठे लावायची, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

याबाबत वाहतूक नियोजन विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर म्हणाले, या पुलाखाली वाहने लावण्यावरून काही नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. त्यामुळे वाहतूक पोलिसांसोबत पाहणी करून धायरी फाटा उड्डाणपुलाखालील दुचाकी वाहनतळ बंद करण्यात आले. अशा प्रकारे जर नागरिकांनी तक्रारी केल्यास शहरातील इतर उड्डाणपुलाखालील वाहनतळाची पाहणी करून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

### पावसामुळे महामार्गावरील रस्त्याला भेग

**पुणे :** पुणे-सातारा महामार्गावरील हरिश्चंद्री परिसरात गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्याखालची माती खचली. यामुळे मुख्य रस्त्याव मोठ्या प्रमाणात भेग पडल्या दिसून आले आहे. परिणाम वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली मिळालेल्या माहितीनुसार, हरिश्चंद्र येथे सध्या ओव्हरब्रिजचे काम सुरु असल्यामुळे तीनपैकी दोन लेन बं होत्या. त्यामुळे वाहतूक फक्त एका लेनवरून सुरू होती. त्यातच य एकमेव उघड्या लेनवर रस्ता खचू मोठी भेग पडल्यामुळे वाहतुकी आणखी अडथळा निर्माण झाला गेल्या ३-४ दिवसांपासून सातत्या पडणाऱ्या पावसामुळे, रस्त्याखालील माती खचली आणि त्यामुळे मुख रस्त्याला मधोमध खोल भेग पडली ही स्थिती अत्यंत धोकादायक होती प्रशासनाने तत्काळ सिमेंटच्य साहाय्याने ही भेग भरून काढली मात्र तोपर्यंत मोठ्या प्रमाणाव वाहतूक कोंडी झाली होती.

## पुण्यात मेघगर्जनेसह पावसाची बॅटिंग!

◆ पुणे (प्रतिनिधी) :

पुण्यात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाला. राज्यात अवकाळी पावसाचा मुक्काम वाढला असून, पुढील काही दिवस मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली होती. त्यानुसार शहराच्या मध्यवर्ती भागाबरोबरच उपनगरात जोरदार सरी बरसण्यास सुरुवात झाली आहे. अचानक सुरू झालेल्या पावसाने पुणेकरांची चांगलीच धांदल उडाली आहे. रस्त्यांना पुन्हा एकदा नद्यांचे स्वरूप आल्याचे दिसून आले आहे. दरवर्षी मे महिन्यात उन्हाचा प्रचंड कडाका जाणवत असतो.

यंदा मात्र हवामानात बदल झाला असून, मे मध्ये सर्वत्र अवकाळी पाऊस होत आहे. गेल्या आठवड्यात राज्यातील विविध भागांत अवकाळी पावसाने मुसळधार हजेरी लावली होती. त्यानंतर आता राज्यात



पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा मुक्काम वाढला आहे. पुढील काही दिवस राज्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या आठवड्यात कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागांत मध्यम ते हलक्या स्वरूपाचा पाऊस, विजांचा कडकडाट आणि ५० ते ६० किमी/तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा आणि कोल्हापूरसह अनेक जिल्ह्यांसाठी यलो आणि ऑरेंज अलर्ट जारी केले आहेत.

### अंदमानात मान्सूनचे आगमन

अंदमान निकोबार बेटांवर मान्सूनचे आगमन झाले असून, या ठिकाणी सध्या हलक्या स्वरूपाचा पाऊस होत आहे. यानंतर पुढील तीन ते चार दिवसांत मान्सून दक्षिण बंगालच्या उपसागरात आणि अंदमानात वाटचाल करणार आहे. नियोजित वेळेच्या एक आठवडा आधीच मान्सून अंदमानात दाखल झाला आहे. पुढील काही दिवसांत मान्सून दक्षिण अरबी समुद्र, मालदीव, अंदमान निकोबारसह मध्य बंगालच्या उपसागरात विस्तार करेल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. यानंतर हळूहळू केरळ आणि महाराष्ट्राकडे मान्सून वाटचाल सुरू करण्याची शक्यता आहे.

### 'जाहिरात फलकाच्या खाली थांबणे टाळा'

**पिंपरी :** पालिकेच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, पालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी, विविध आकाराचे आणि उंचीचे फलक उभारण्यात आलेले आहेत. प्रतिवर्षी मान्सूनपूर्ववादळ, वाऱ्यामुळे असे जाहिरात फलक पडण्याचे प्रकार शहरात व शहराबाहेर घडलेले आहेत. हा पूर्वानुभव विचारात घेता, यावर खबरदारीचे उपाय म्हणून महापालिकेने यापूर्वीच सर्व जाहिरातदार यांना मान्सुनपूर्व कालावधीत सर्व जाहिरात फलकांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करणे. याबरोबरच नागरिकांनी या मान्सून कालावधीत अशा जाहिरात फलकाच्या खाली अथवा जाहिरात फलकाच्या आसपास थांबण्याचे टाळावे अथवा आपली वाहने फलकाखाली लावू नयेत याची सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी असे आवाहन परवाना विभागाचे उप आयुक्त राजेश आगळे यांनी केले आहे.

## 'महाराष्ट्रात आरक्षण उपवर्गीकरण ताबडतोब लागू करा'



◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

राज्यात सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्तरावर मागास राहिलेल्या मांग, मातंग, व इतर समाजाला आरक्षणाचे वर्गीकरण करून न्याय द्यावा, या प्रमुख मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानात मंगळवारी या समाजाचा जनआक्रोश मोर्चा च्या माध्यमातून आंदोलन करण्यात आले. या मोर्चात सत्ताधारी पक्षाचे आमदार, विविध पदाधिकारी यांच्यासह राजकीय आणि शैक्षणिक संघटनांचे प्रमुख पदाधिकारी यांच्यासह लाखो नागरिक उपस्थित होते. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या वर्गीकरणासंदर्भात दिलेल्या निर्णयानंतर तेलंगणा सरकारने यासाठीची अंमलबजावण सुरू केली, त्यानंतर कर्नाटक सरकारही ही अंमलबजावणी करी आहे, मात्र महाराष्ट्रात कोणत्या हालचाली सुरू नसल्याने ह जनआक्रोश मोर्चा हे आंदोल मुंबई आझाद मैदान येथे घेण्या आला. पहिल्यापासून मातंग समाज हा महायुती सोबत राहिलेला आ असे आमदार अमित गोरखे म्हणाले यावेळी मंत्री चंद्रशेखर बावनकु म्हणाले की, मातंग समाजाच आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच मागणी लवकरच पूर्ण करण्यासाठ मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठकी आयोजन करण्यात येईल व अ आश्वासन त्यांनी दिले.

#### मुलांमध्ये टाइप-२ मधुमेहात लक्षणीय वाढ

## शाळकरी विद्यार्थ्यांच्या साखरेवर लक्ष ठेवणार 'शुगर बोर्ड'

◆ पुणे (प्रतिनिधी) :

बदलत्या जीवनशैलीचा लहान मुलांच्या आरोग्यावरही मोठा परिणाम होत असून, शाळकरी वयातच डायबिटीजसारखे गंभीर आजार आढळू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई संलग्न शाळांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये मधुमेहाचे प्रमाणावर लक्ष ठेवण्यासाठी लवकरच 'शुगर बोर्ड' स्थापन केले जाणार आहे. तसेच मुलांमध्ये मधुमेहाच्या वाढत्या घटनांबद्दल चिंता व्यक्त करीत सीबीएसईने साखर मंडळ स्थापन करण्याचे निर्देश जारी केले आहेत. गेल्या दशकात मुलांमध्ये टाइप-२ मधुमेहात लक्षणीय वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, यामुळे हा निर्णय घेतल्याचे सीबीएसईने स्पष्ट केले आहे.

साखर मंडळामार्फत शाळांमध्ये चर्चासत्रे आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातील. वेगवेगळे तज्ज्ञ मुलांना साखरेच्या दुष्परिणामांबद्दल जागरूक करतील. यासंदर्भात सीबीएसईने संलग्न शाळांच्या मुख्याध्यापकांना सूचना जारी केल्या आहेत. पूर्वी टाइप-२ मधुमेह हा आजार प्रामुख्याने प्रौढांमध्ये दिसून येत होता; परंतु आता मुले देखील त्याचे बळी ठरत आहेत. ही चिंताजनक प्रवृत्ती मुख्यत्वे जास्त साखरेच्या सेवनामुळे आहे. बहुतेकदा शाळेच्या कॅम्पसमध्ये गोड स्नॅक्स, पेये आणि प्रक्रिया केलेले अन्न सहज उपलब्ध होतात, यावर नियंत्रण आणण्याची जबाबदारी शुगर बोर्डाची असेल.

तसेच जास्त साखरेचे सेवन केल्याने केवळ मधुमेहाचा धोका वाढत नाही तर लठ्ठपणा, दंत समस्या आणि इतर विकार देखील वाढतात. अशा परिस्थितीत सीबीएसईने शाळांना 'शुगर बोर्ड' स्थापन करण्यास सांगितले आहे.



### शाळांना अहवाल सादर करावा लागणार

सीबीएसईने स्पष्ट केल्यानुसार, शाळांनी यासंदर्भात आवश्यक ती कारवाई करावी; जेणेकरून निरोगी शालेय वातावरण निर्माण करता येईल. एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की, ४ ते १० वर्षे वयोगटातील मुलांसाठी दररोजच्या कॅलरीजच्या सेवनात साखरेचा वाटा १३ टक्के आहे. ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी १५ टक्के आहे, तर दररोजच्या कॅलरीजचे सेवन फक्त पाच टक्के असावे. असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, शाळांनी यासंदर्भात काय कारवाई केली, याचा सविस्तर रिपोर्ट फोटोसह येत्या १५ जुलैपर्यंत सादर करण्याचे निर्देश देखील देण्यात आले आहेत.

## सणसवाडीत कोसळले होर्डिंग

◆ पुणे (प्रतिनिधी) :

पुणे शहरात मंगळवारी सायंकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले असून, वाघोलीजवळील सणसवाडी परिसरात एक मोठा अपघात टळला. या पावसामुळे पुणे-अहिल्यानगरील सनसवाडी परिसरात रस्त्यावर मोठे होर्डिंग रस्त्यावर कोसळले. या दुर्घटनेत सात ते आठ दुचाकी वाहने थेट होर्डिंगखाली अडकली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

होर्डिंग कोसळण्याची घटना मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली. वाघोलीजवळील सणसवाडी भागात एका उंच होर्डिंगचा आधार कमकुवत झाल्याने ते कोसळले. त्यावेळी पावसामुळे वाहनांची गती कमी होती व वाहतूकही तुलनेने



मंदावल्याने मोठा अनर्थ टळला. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी व वाहतूक पोलिसांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. अग्निशमन दल व आपत्ती व्यवस्थापन पथकाने घटनास्थळी धाव घेतली व अडकलेल्या वाहनांना बाहेर काढण्याचे काम तातडीने सुरू केले.

सदर होर्डिंग अधिकृत परवानगीने उभारण्यात आले होते की नाही, याची चौकशी प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. स्थानिक पोलीस य प्रकरणाची सखोल चौकशी कर असून, यामध्ये संबंधित जाहिरा कंपनीवर कारवाई होण्याची शक्यत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध भीतीचे वातावरण पसरले असून शहरात इतर ठिकाणी असलेल्य धोकादायक होर्डिंग्जवर कारवा करण्याची मागणी पुणेकरांकडून जो धरत आहे.

# विज्ञानव्रती

बहुसंख्य लोक तोंडाने आपण खूप विज्ञानवादी आहोत असे सांगतात, पण कोणत्याही शुभकार्याला नारळ फोडण्याचे आणि कसलेही धर्म कार्य करतात. वर त्यांचे समर्थन असे असते की, मी तर विज्ञानवादी आहेच पण माझी पत्नी किंवा आई किंवा घरच्यांच्या समाधानासाठी हे करावे लागते. त्या ढोंगाच्या बतावणीला डॉ. जयंत नारळीकर यांनी आयुष्यभर चपखलपणे नाकारले आणि खरा विज्ञानव्रती काय असतो हे दाखवून दिले. प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचे मंगळवारी पुण्यात सकाळी निधन झाले. त्यांच्या नावावर अनेक सिद्धांतांचे जन्म आहेत तसेच बिग बँग थिअरी आणि गुरूत्वाकर्षण सिद्धांत विकसित करण्याचे संशोधन कार्य आहे. नारळीकर यांनी वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी पद्मभूषण पुरस्कार मिळवला. नारळीकर यांचे कार्य एवढ्यापुरते सीमित नाही. त्यांनी अनेक पुरस्कार पटकावले आणि त्यांच्या अधिपत्याखाली आययूसीएने उत्कृष्टता केंद्र म्हणून ख्याती मिळवली. त्यांना अनेक सन्मान मिळवले, पण त्यांच्या बिग बँग थिअरीच्या संशोधनासाठी ते जगभर गणले गेले. बिग बँग थिअरी म्हणजे अशी आहे की, आपले युनिव्हर्स हे अशा लहान बिंदूपासून सुरू झाले आणि ते विस्तारत आज आहे तसे व्यापक आणि विशाल झाले. त्यांनी फ्रेड हॉयल यांच्यासोबत ग्रॅव्हिटी थिअरीवर काम केले आणि एक सिद्धांत विकसित केला जो आज नारळीकर- हॉयल सिद्धांत म्हणून प्रख्यात आहे. हीच आहे ती कॉन्फ्रफर्नल ग्रॅव्हिटी थिअरी. विज्ञानाचे अवडंबर न माजवता वैज्ञानिक दृष्टिकोन सदासर्वदा बाळगणारे डॉ. जयंत नारळीकर हे विज्ञानाचे व्रती होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

डॉ. नारळीकर यांचे विज्ञानातील कार्य अतुलनीय आहे आणि त्यांचे सिद्धांत तर बेजोड आहेत. त्यांनीच विकसित केलेला हॉयल नारळीकर गुरूत्वाकर्षण सिद्धांत हा आज जगभरच्या शास्त्रज्ञांसाठी आदर्श होऊन बसला आहे. त्यांचा कॉन्फर्नल ग्रॅव्हिटी सिद्धांत हा विकसित केला आणि तो आईनस्टाईनच्या सापेक्षता सिद्धांताला वेगळा दृष्टिकोन देतो. पण नारळीकर यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी रूक्ष विज्ञानाला आपले मानले नाही, तर त्याला लोकांमध्ये लोकप्रिय बनवण्यासाठी विज्ञान कथा आणि कादंबऱ्या लिहिल्या. त्याही अतोनात लोकप्रिय झाल्या आणि त्यातीलच एक आहे 'वामन परत न आला' ही कादंबरी. केवळ विज्ञानकथा हा समाजाशी फटकून वागणारा असू शकत नाही, तर त्याने समाजासाठी त्याचे योगदान दिले पाहिजे हे नारळीकर यांनी पटवून दिले. त्यासाठी त्यानी विलक्षण विज्ञानकथा लिहील्या आणि त्या लोकप्रिय झाल्या. आज विद्यार्थी इंजिनियर किंवा डॉक्टर होण्याच्या मागे लागला आहे किंवा कॉम्प्युटरमध्ये एखादी पदवी मिळवून मोठी नोकरी पटकावायची हेच त्याचे स्वप्न राहिले आहे. ते नारळीकर यांना शक्य असते, तर त्यांनी ते केलेही असते. पण त्यांनी तसे केले नाही. विज्ञानाचा उपयोग समाजासाठी करायचा या हेतूने ते पछाडले गेले आणि त्यातून त्यांनी विज्ञानकथा लिहील्या. आज प्युअर सायन्स घेऊन जाणारे किती विद्यार्थी आहेत याचे संशोधन करावे लागेल. विद्यार्थ्यांना दहावीला ९० टक्के गुण मिळाले किंवा बारावीला मेरिटमध्ये पास झाला की लगेच त्याला इंजिनियर होण्याची स्वप्ने पडतात. पण बेसिक सायन्सेसकडे विद्यार्थी वळतच नाहीत. ही खंत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विज्ञान संमेलनात बोलून दाखवली होती. आजच्या या प्रश्नाला नारळीकरांचे आयुष्य हे चांगले उत्तर आहे.

नारळीकर यांचा जन्म रँगलर नारळीकर यांच्या घरात झालेला. त्यांची आईही संस्कृत स्कॉलर होती. त्यांनी विज्ञानाचे संशोधन हाती घेतले आणि प्रचंड कार्य केले. डॉ. नारळीकर यांनी अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळवले आणि त्यात पद्मविभूषण, तसेच वयाच्या २६ व्या वर्षी मिळालेला पद्मभूषण हा पुरस्कार ही आहे. पण त्यानी साहित्यात जे कार्य केले त्याला तोड नाही. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार लाभला आणि त्यांनी विज्ञानकथा वाचकांमध्ये लोकप्रिय बनवल्या. त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यायला हवेत. कारण विज्ञानकथा म्हणजे वाचकांच्या डोक्यावरून जायला हवी अशी जी धारणा होती ती नारळीकर यांनी पुसून टाकली. जयंत नारळीकर हे कोणतेही दंभ न करताही विज्ञानाचे शिलेदार होते आणि त्यांनी ते कार्य आपण होऊन स्वीकारले होते आणि ते शेवटपर्यंत पुढे नेले. कोणताही वैज्ञानिक नम्र असतो आणि त्याचे नारळीकर हे मूर्तिमंत रूप होते. त्यानी कधीही आपल्या संशोधनाचा दंभ मिरवला नाही. नाही तर आपल्याकडे थोडे यश मिळाले, तर अर्ध्या हळकुंडात पिवळे होणारे आणि इतरांना शहाणपण शिकवणारे आणि धर्म नाकारणारे वैज्ञानिक आहेत. पण विज्ञान हे खरेखुरे विज्ञान असते आणि त्यात दुसरे काही भेसळ नको असे मानणारे जयंत नारळीकर होते असे आदराने म्हणावे वाटते. त्यांचा वाढदिवस हा विज्ञानकथा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांनी खगोलशास्त्रज्ञ म्हणून कार्य केले त्याला जगात कुठेही तोड नाही. विज्ञान हे अंतिम ज्ञान नाही हे अध्यात्मिक गुरुंइतकेच नारळीकरांसारखे व्रतस्थ ही जाणत. इतिहासात साक्ष आहे की कोपर्निकसने अगोदर सूर्य पृथ्वीभोवती फिरतो असे संशोधन केले होते. त्याला जगमान्यताही मिळाली होती. तो सिद्धांत नाकारणाऱ्या अनेकांना फाशी देण्यासाठी तत्कालीन समाजाने काढले होते. पण कोणतेही विज्ञान हे परिपूर्ण कधीच नसते आणि त्यात नवनवीन संशोधन होत असते. त्यामुळे कालांतराने कोपर्निकसचा सिद्धांत चुकीचाच ठरला. नारळीकर हे स्वतःला अंतिम ज्ञान मिळाले आहे हे समजत नसत. तसे ते कोणत्याही शास्त्रज्ञांनी समजू नये. म्हणून तर त्यांना व्रतस्थ शास्त्रज्ञ म्हटले जाते.

## राशिभविष्य

बुधवार, २१ मे २०२५

### ।। पंचांग ।।

आज मिती वैशाख कृष्ण नवमी शके १९४७ चंद्र नक्षत्र शततारका, योग वैधृती ,चंद्र राशी कुंभ. भारतीय सौर ३१ वैशाख शके १९४७ म्हणजेच बुधवार दिनांक २१ मे २०२५ मुंबईचा सूर्योदय ६.०२ मुंबईचा सूर्यास्त ७.०८, मुंबईचा चंद्रोदय २.०३, उद्याचा मुंबईचा चंद्रास्त १.१८, राहू काळ १२.३५ ते २.१३.

### ।। भविष्य ।।

**मेष** : अनुकूलता लाभणार आहे.

**वृषभ** : अकारण खर्च होण्याची शक्यता आहे.

**मिथुन** : आत्मविश्वासाने काम करा .

**कर्क** : आज आपले मन शांत नसणार आहे.

**सिंह** : मनासारख्या घटना घडतील.

**कन्या** : कामाच्या स्वरूपात बदल होण्याची शक्यता आहे.

**तूळ** : चांगल्या संधी येण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** : वाहन चालवताना काळजी घेणे

**धनू** : वृद्धी करण्याची संधी येऊ शकते.

**मकर** : कामांमध्ये चुका होऊ देऊ नका.

**कुंभ** : गृहसौख्य चांगले लाभणार आहे.

**मीन** : मन आनंदी असणार आहे.

# व्यक्ती नव्हे, एक संस्था...





**डॉ. रघुनाथ माशेलकर**
**ज्येष्ठ शास्त्रज्ञ**

डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुखद आहे. त्यांनी आपल्या क्षेत्रात प्रचंड काम करून ठेवले आहे. काळाच्या ओघात व्यक्ती पडद्याआड जाते पण संस्था उरते. याच न्यायाने जयंत नारळीकर व्यक्ती नव्हे तर संस्था होते, असे मला वाटते. त्यांनी उभी केलेली 'आयुका' ही संस्था कायमच नवनवीन पिढ्या घडवत राहणार आहे. या संस्थेच्या रुपाने ते कायमच आपल्यामध्ये राहतील.

माझ्या मते, नारळीकर थोर शास्त्रज्ञ होतेच, तर विज्ञानावरील तेवढेच मोठे भाष्यकार (कम्युनिकेटर) आणि तितकेच चांगले माणूस होते. त्यांच्याठायी होती तेवढी माणुसकी मी अन्य कुठे पाहिलेली नाही. त्यांच्याकडे पाहून नेहमीच इतका मोठा माणूस इतका नम्र कसा असू शकतो, हा प्रश्न पडायचा. तो कधीही सुटणारही नाही, असे आता वाटते.

जयंत नारळीकर यांनी त्यांच्या क्षेत्रात प्रचंड काम करून ठेवले आहे. त्यातही ती केवळ एक व्यक्ती नव्हती तर संस्था होती, असे मला म्हणावेसे वाटते. काळाच्या ओघात व्यक्ती पडद्याआड जाते पण संस्था उरते. याच न्यायाने जयंत नारळीकर कायमच आपल्यामध्ये राहणार आहेत. त्यांनी उभी केलेली 'आयुका' ही संस्था कायमच नवनवीन पिढ्या घडवत राहणार आहे. 'आयुका'विषयी आपल्यापैकी प्रत्येकाला सार्थ अभिमान आहे. या संस्थेने आत्तापर्यंत अनेक खगोल भौतिकशास्त्रज्ञ, विश्वशास्त्रज्ञ घडवले आहेत. या सगळ्यामागे डॉ. जयंत नारळीकर यांचे फार मोठे योगदान आहे. त्यांनी सर फ्रेड हॉईल यांच्याबरोबर हॉईल-नारळीकर थेअरी मांडली. हे एक खास मॉडेल होते. खगोल भौतिकशास्त्रातील त्यांचे हे योगदानही अत्यंत महत्त्वाचे म्हणून गणले जाते.

अशा या दिग्गज शास्त्रज्ञाबरोबर काम करण्याची मोठी आणि महत्त्वाची संधी मला मिळाली. राजीव गांधी यांच्या 'सायन्स ॲडव्हायजरी कमिटी फॉर प्रायमिनिस्टर' च्या पहिल्या कमिटीमध्ये प्रो. सीएनआर अध्यक्षपदी होते तर मी आणि डॉ. जयंत नारळीकर सदस्य होतो. या कमिटीचे काम करत असताना नारळीकर विज्ञानाकडे, शास्त्राकडे कसे पाहतात एवढेच समजले नाही, तर देशाला विज्ञानाच्या वाटेने पुढे कसे न्यायचे, त्यासाठी धोरणे कशी असावी, मुलांमध्ये विज्ञानाची आवड कशी निर्माण करायची, कुतूहल कसे निर्माण करायचे यासंबंधीचे त्यांचे विचार जाणून घेण्याची संधीही मिळाली. त्याचे महत्त्व किती मोठे होते, हे समजून घेता आले. खरेतर अशाप्रकारे शास्त्रशुद्ध, विज्ञाननिष्ठ विचारांची पायाभरणी करणे हेच तेव्हाचे महत्त्वाचे कामे होते. नारळीकरांच्या मार्गदर्शनाने ते योग्य पद्धतीने पुढे गेले, कार्यान्वित झाले असे म्हणता येईल.

त्यांनी विज्ञानविश्वात मोलाचे काम केलेच त्याचबरोबर त्यावर सोप्या भाषेत पुस्तकेही लिहिली. जनसामान्यांना, अगदी मुलांना समजेल इतक्या सोप्या, साध्या भाषेत मूळ विषयाची मांडणी असल्यामुळे त्यांच्या लेखनाला मोठा वाचनवर्गही मिळाला. याच कामामुळे नारळीकरांना साहित्यिक म्हणून गौरवणारे अनेक पुरस्कारही देण्यात आले. त्यांचे हे योगदानही खूप मोठे आहे. त्यांनी अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद तेवढ्याच ताकदीने भूषवले होते. एखाद्या शास्त्रज्ञाने साहित्यविश्वात हे स्थान मिळवण्याची घटनाही दुर्मीळ म्हणावी लागेल. महत्त्वाचे म्हणजे या क्षेत्रात सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या युनेस्को कलगा पुरस्काराचेही ते मानकरी होते. ही मोठी उपलब्धी त्यांची महानता दर्शवणारी आहे. विज्ञानाच्या विविध शाखांमध्ये अनेकजण काम करतात. मात्र विज्ञान संवाद प्रत्येकाला जमतोच असे नाही. हा आपला प्रांत नाही, असे काहींचे म्हणणे असते. त्यामुळेच विज्ञान संवाद वाढवणारी, जनसामान्यांना समजेल अशा भाषेत वैज्ञानिक विचार, तथ्ये पोहोचवणारी हाताच्या बोटावर मोजता येतील इतकीच माणसे पाहायला मिळतात. डॉ. जयंत नारळीकर हे अशा मान्यवरांमधील एक महत्त्वाचे नाव होते. त्यामुळेच ते काळाच्या पडद्याआड गेल्याने झालेली हानी खूप मोठी आहे. डॉ. जयंत नारळीकर यांनी विज्ञानाप्रमाणेच सायन्स कम्युनिकेशनमध्येही एव्हरेस्टइतकी उंची गाठली. मला ही बाब विशेष महत्त्वाची वाटते.

समाजामध्ये डॉ. जयंत नारळीकर या नावाला मोठी ओळख होती. प्रचंड लोकप्रियता मिळवलेले हे नाव होते. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी नेहमीच प्रचंड गर्दी होत असे. यासंबंधीची साधारणतः २०-२५ वर्षांपूर्वीची गोष्ट आज आठवते. तेव्हा 'इंडियन अकादमी ऑफ सायन्स'ची एक मिटींग होती. त्यामधील एका सत्रात डॉ. जयंत नारळीकर प्रथम बोलणार होते आणि नंतर मी बोलणार होतो. पण त्यांची लोकप्रियता लक्षात घेत मी आयोजकांना माझ्यानंतर त्यांनी बोलावे अशी विनंती केली. कारण अगदी स्पष्ट होते. ते आधी बोलले असते तर त्यांना ऐकल्यानंतर उपस्थित निघून जातील आणि माझे ऐकायला प्रेक्षकच उरणार नाहीत असे कुठेतरी वाटून गेले होते...! ही बाब त्यांची विलक्षण लोकप्रियता दाखवून देण्यास पुरेशी आहे.

मी १९७६ च्या नोव्हेंबरमध्ये परदेशातून भारतात परत आलो आणि काही दिवसांनी 'नवनीत' कंपनीच्या मालक ताराताई बोले यांची भेट घेण्यासाठी गेलो होतो. बोलणे झाले आणि निघताना आशीर्वाद देताना त्या मला म्हटल्या,'मोठा हो आणि जयंत नारळीकर हो...'. यावरूनच त्यांच्या कामाची, या व्यक्तिमत्त्वाची उंची किती मोठी होती, हे समजते. शास्त्रज्ञ कसा असावा आणि किती मोठा असावा, याचा जणू ते एक मापदंड होते. अत्यंत आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणूनच सर्वांनी त्यांच्याकडे पाहिले. यापुढे अशी व्यक्ती होणे नाही. आधी म्हटल्याप्रमाणे ती व्यक्ती नव्हती तर संस्था होती. म्हणूनच या रुपाने ते अमर आहेत. त्यांचे विश्वाच्या उत्पत्तीविषयीचे काम देशच नव्हे, तर जग कायमच लक्षात ठेवेल.

# एक नेशन, एक मिशन, विरोधकांमध्ये खदखद...





**इंडिया कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**

ऑपरेशन सिंदूर व पाकिस्तानचा दहशतवाद चेहरा जगाला समजावून सांगण्यासाठी केंद्र सरकारने सर्वपक्षीय शिष्टमंडळाच्या नावांची घोषणा केली आणि विरोधी पक्षात असंतोषाचे फटाके फुटू लागले. आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर आम्ही सरकारबरोबर आहोत, पण सर्वपक्षीय शिष्टमंडळात आमच्या पक्षाचे कोण प्रतिनिधी असावेत हे सरकार कोण ठरवणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पाकिस्तानमधील दहशतवादाच्या विरोधात ऑपरेशन सिंदूरला आमचा संपूर्ण पाठिंबा आहे, पण सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठवताना सरकारने केलेले राजकारण आम्ही खपवून घेऊ शकत नाही असा इशारा संसदेतील प्रमुख विरोधीपक्ष काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसने दिला आहे. सर्वपक्षीय शिष्टमंडळाचे वऱ्हाड विदेशात पाठविण्याची गरजच काय असा प्रश्न ठाकरे यांच्या उबाठा सेनेने विचारला आहे, तर आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर स्थानिक राजकारण आणू नये, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) अध्यक्ष शरद पवार यांनी सुनावले आहे. पाकिस्तानात घुसून केलेल्या कारवाईबद्दल सरकारचे व सैन्य दलाचे अभिनंदन करण्यासाठी भाजपाच्या वतीने देशभर रोज तिरंगा यात्रा निघत आहेत आणि दुसरीकडे भारताची भूमिका विदेशात मांडण्यासाठी जाणाऱ्या शिष्टमंडळात आमच्या पक्षाचे हेच प्रतिनिधी का घेतले व आम्ही सांगितलेले का नाही घेतले, यावरून राजकीय वादंग पेटले आहे.

काश्मीरमधील पहलगाम येथे धर्म विचारून २६ हिंदू पर्यटकांची दहशतवाद्यांनी निर्घृण हत्या केल्यावर भारतीय सेनेने पाकिस्तानात घुसून ड्रोन व क्षेपणास्त्रांचा हल्ला करून शंभरपेक्षा जास्त दहशतवाद्यांचा खात्मा केला. तीनच दिवसांनी शस्त्रसंधी झाली. या युद्धात भारताने बजावलेली भूमिका अन्य देशांना समजावून देण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळे जगभर पाठविण्याचा केंद्र सरकारने निर्णय घेतला. विशेषतः संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे सदस्य असलेल्या (युएनएससी) व अन्य काही देशांमध्ये जाऊन भारतीय शिष्टमंडळे भारताची बाजू मांडतील अशी कूटनीती ठरविण्यात आली. केंद्रीय संसदीय मंत्री किरेन रिजिजू यांनी एक्सवर म्हटले- सबसे बडे मौकेपर भारत एकजूट है... एक मिशन, एक संदेश, एक भारत...

सर्वपक्षीय सात शिष्टमंडळे विविध देशात जातील व दहशतवादाच्या विरोधात भारत का व कसा लढतो आहे हे सांगतील. संसदीय कार्य मंत्रालयाने शिष्टमंडळाच्या नावाची यादी जाहीर केली आणि विरोधी पक्षात असंतोषाची ठिणगी पडली. या यादीत काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांचे नाव जाहीर होताच, काँग्रेस मुख्यालयात भूकंप झाला. पक्षाने शशी थरूर यांचे नाव सरकारला पाठवलेच नव्हते, मग जाहीर कसे झाले? अशी विचारणा काँग्रेसने केली. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी चर्चा केली. सरकारच्या वतीने विदेशात पाठविण्यासाठी शिष्टमंडळात काँग्रेस पक्षाने चार खासदारांची नावे शिफारस करावीत असे त्यांना सांगितले. काँग्रेसने आनंद शर्मा, गौरव गोगई, डॉ. सय्यद नसीर हुसैन व राजा बरार अशा चार नावांची शिफारस केली.

काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी सरकारच्या विदेशी शिष्टमंडळात आपले नाव जाहीर होताच, नरेंद्र मोदी सरकारचे आभार मानले. आपल्याला विदेशी प्रतिनिधीमंडळात संधी दिलीत हा सरकारने माझा सन्मान केलाय, असेही त्यांनी म्हटले. शशी थरूर यांची केंद्र सरकारने केलेली निवड काँग्रेस पक्षाला मुळीच पसंत पडलेली नाही. किंबहुना काँग्रेस हायकमांडच्या मनाविरुद्ध शशी थरूर यांचा विदेशी जाणाऱ्या प्रतिनिधीमंडळात समावेश करण्यात आला व त्यांच्यावर एका प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी देण्यात आली हे काँग्रेस नेतृत्वाला आणखी खटकले. पहलगाम हत्याकांडानंतर भारत सरकारने जी दहशतवादाच्या विरोधात खंबीर कारवाई केली त्याचे शशी थरूर यांनी मुक्त कंठाने कौतुक केले होते. त्यांनी केलेली सरकारची प्रशंसा काँग्रेसमधील अनेकांना पसंत पडलेली नव्हती. पाकिस्तानवर कारवाई करताना भारताने पाकव्याप्त काश्मीरमधील केवळ दहशतवादी तळांना भारताने लक्ष्य केले, असे शशी थरूर यांनी सांगून केंद्र सरकारच्या कारवाईचे ठोस समर्थन केले होते. मात्र दुसरीकडे काँग्रेसने मोदी सरकारमध्ये पारदर्शकताचा अभाव आहे असे आरोप केले. काँग्रेसचा एक खासदार सरकारची प्रशंसा करतोय व पक्ष मात्र सरकारवर टीका करतोय हे चित्र युद्ध काळात बघायला मिळाले. पक्षाचे नेते जयराम रमेश यांनी तेव्हाच खुलासा केला की, जेव्हा थरूरसाहेब बोलतात, ती पक्षाची भूमिका नाही. ते त्यांचे वैयक्तिक मत आहे...

शशी थरूर हे मोदी सरकारच्या आहारी गेले आहेत, असे काँग्रेसमधील अनेकांना वाटते. ते सातत्याने पक्षाशी विसंगत भूमिका मांडत आहेत. पक्षाचे नेते व शशी थरूर यांच्यात अंतर वाढले आहे. सन २०१४ मध्ये पक्षाने त्यांचे प्रवक्तेपद काढून घेतले. तेव्हा त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींविषयी बरेच काही चांगले लिहिले होते. सन २०२० मध्ये काँग्रेसमध्ये असंतुष्ट नेत्यांनी पक्षाच्या कार्यपद्धतीविषयी नाराजीचा सूर काढला तेव्हा जी २३ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गटात शशी थरूर आघाडीवर होते. पक्षात मोठे परिवर्तन झाले पाहिजे अशी जी २३ गटाने मागणी केली होती. नंतर जी २३ मधील काही नेते पक्ष सोडून गेले. सन २०२२ मध्ये थरूर यांनी काँग्रेस अध्यक्षपदासाठी मल्लिकार्जुन खरगेंच्या विरोधात निवडणूक लढवली. खरगे यांना गांधी परिवाराचे समर्थन असताना थरूर यांना एक हजारपेक्षा जास्त मतदान झाले होते.

देशाची भूमिका जगापुढे ठामपणे मांडली जावी यासाठी केंद्र सरकारने यावेळी काही प्रथमच विरोधी पक्षांची मदत घेतली असे नव्हे. दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर पाकप्रेरीत मोठा दहशतवादी हल्ला झाला, त्यानंतरही केंद्रातील डॉ. मनमोहन सिंग सरकारने सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळ जगभर पाठवून पाकिस्तान दहशतवादाला कसे प्रोत्साहन देतो, हे सांगण्याची मोहीम राबवली होती. सन १९९४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी काश्मीरच्या मुद्यावर भारताची भूमिका मांडण्यासाठी तत्कालीन विरोधी पक्षनेते अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाकडे भारताचे सर्वपक्षीय प्रतिनिधीमंडळ पाठवले होते.

तृणमूल काँग्रेसनेही एक नेशन, एक मिशनमध्ये खोडा घातला. पक्षाचे खासदार व विख्यात क्रिकेटपटू युसूफ पठाण पाकचा पर्दाफाश करायला विदेश दौऱ्यावर जाणार नाही असे पक्षाने जाहीर केले. तृणमूल काँग्रेसने म्हटले आहे की, परराष्ट्र धोरण हा भारत सरकारचा विषय आहे. त्याची संपूर्ण जबाबदारी केंद्र सरकारने घेतली पाहिजे. राष्ट्रहितासाठी केंद्र सरकारच्या खांद्याला खांदा उभा लावून पक्ष उभा राहील, मात्र केंद्राचे निर्णय एकतर्फी असता कामा नयेत. देशाच्या प्रतिनिधीमंडळात राजकीय पक्षांचे सदस्य कोण असावेत हे पक्ष ठरवेल, सरकार नाही...

इंडिया ब्लॉकच्या सदस्यांनी विदेशी वऱ्हाडावर बहिष्कार घातला पाहिजे अशी अजब भूमिका उबाठा सेनेने मांडली आहे.

मोदी सरकारने शशी थरूर यांनाच का निवडले हा कळीचा मुद्दा आहे. थरूर यांनी १९७८ ते २००७ या काळात युनायटेड नेशन्समध्ये विविध पातळीवर उच्च पदांवर काम केले आहे. त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व आहेत. त्यांच्याकडे उत्तम वक्तृत्व व उत्तम शैली आहे. अमेरिका व ब्रिटनमध्ये ते बराच काळ होते. भारतीय प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व करण्याची क्षमता व प्रतिमा त्यांच्यात आहे. ऑपरेशन सिंदूरचे त्यांनी सुरुवातीपासूनच जाहीरपणे समर्थन केले. काँग्रेस पक्षाने केंद्राला शिष्टमंडळासाठी जी चार नावे दिली ते नेते पकिस्तान व तुर्कीच्या मुद्यावरून सरकारला सतत घेरण्याचा प्रयत्न करीत होते.

केंद्र सरकारने ज्या सात शिष्टमंडळाची घोषणा केली आहे, त्यात ५१ सदस्य व काही माजी मंत्री आहेत. त्या शिवाय भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे आठ वरिष्ठ अधिकारीही आहेत. बैजयंत पांडा व रविशंकर प्रसाद (भाजपा), संजयकुमार झा (जनता दल यू), डॉ. श्रीकांत शिंदे (शिवसेना), शशी थरूर (काँग्रेस), कनिमोझी करुणानिधी (द्रमुक), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस) यांच्या नेतृत्वाखाली ५९ सदस्यांची प्रतिनिधीमंडळे ३२ देशांचा दौरा करतील व बेल्जियममधील ब्रुसेल्स येथे युरोपीय संघाच्या मुख्यालयाला भेट देतील. सर्व प्रतिनिधी मंडळात सत्ताधारी एनडीएचे ३१ व विरोधी पक्षांचे २० सदस्य व माजी मंत्री आहेत. प्रत्येक प्रतिनिधीमंडळात एक मुस्लीम सदस्य आहे. काँग्रेसने शिफारस केलेल्या चौघांपैकी केवळ आनंद शर्मा यांचे नाव प्रतिनिधीमंडळात आहे.

शशी थरूर यांच्या व्यतिरिक्त मनीष तिवारी, अमर सिंह, सलमान खुर्शीद या तीन काँग्रेस नेत्यांचा शिष्टमंडळात समावेश आहे. या चार जणांना केंद्राने स्थान दिल्याने काँग्रेस सरचिटणीस जयराम रमेश यांनी नाराजी व्यक्त केली आहे. विदेशी प्रतिनिधीमंडळाच्या मुद्यावर सरकार राजकारण खेळते आहे, असा त्यांनी आरोप केला आहे. प्रतिनिधी मंडळात माजी केंद्रीयमंत्री गुलाम नबी आजाद, एम. जे. अकबर, आनंद शर्मा, व्ही मुरलीधरन, सलमान खुर्शीद आणि एस. एस. अहलुवालिया याचा समावेश आहे, पण ते सर्व माजी संसद सदस्य आहेत.

**sukritforyou@gmail.com**
**sukrit@prahaar.co.in**

# बाल गुन्हेगारी : शस्त्रांचा वापर आणि अमली पदार्थ...



**फॅमिली काऊन्सलिंग**
**मीनाक्षी जगदाळे**

आजकाल लहान मुले आणि तरुण पिढीमध्ये गुन्हेगारीची वाढती प्रवृत्ती, अवैध शस्त्रांची सहज उपलब्धता आणि अमली पदार्थांचे वाढते व्यसन ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. या प्रश्नांची सखोल माहिती घेणे, त्यांची कारणे समजून घेणे आणि त्यावर प्रभावी उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. तरी या लेखातून आपण यामागील कारणे, उपाययोजना यावर प्रकाश झोत टाकणार आहोत.

**अवैध शस्त्रे उपलब्धता आणि आकर्षणाची कारणे :** अवैध शस्त्रे मिळण्याचे स्रोत याचा विचार केला असता, स्थानिक पातळीवरील विक्रेते यासाठी खूप मोठं कारण आहे. अनेकदा 'गावठी पिस्तूल' किंवा स्थानिक पातळीवर बनवलेली शस्त्रे अल्पवयीन मुलांपर्यंत हे विक्रेते पोहोचवतात. हे विक्रेते गुप्तपणे कार्यरत असतात. गुन्हेगारी टोळ्या पण अशा प्रकारे शस्त्र पुरवण्यासाठी सक्रिय असतात. चोरी किंवा इतर मार्गांनी सुद्धा शस्त्रे मिळवली जातात अथवा इतर बेकायदेशीर मार्गांनी मिळवली जातात.

**ऑनलाइन उपलब्धता:** डार्क वेब किंवा काही विशिष्ट गुप्त ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरूनही शस्त्रे मागवली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, जरी हे प्रमाण कमी असले तरी धोकादायक आहे. युवा पिढीचा सामाजिक माध्यमाचा चुकीच्या पद्धतीने वाढता वापर, विविध ॲप्लिकेशन, फ्लॅटफॉर्मचा वापर त्यांना अशा ऑनलाइन शस्त्र विक्री-खरेदीच्या जाळ्यात ओढण्यास कारणीभूत ठरतो.

शक्ती प्रदर्शन आणि दहशत पसरवणे यासाठी अर्धवट बुद्धीची मुलं कुठलाच विचार करत नाहीत. शस्त्र बाळगल्याने इतरांवर प्रभाव पडतो, परिसरात दहशत निर्माण होते आणि स्वतःला शक्तिशाली समजण्याची भावना वाढते.

**समवयस्कांचा दबाव आणि आकर्षण:** मित्रगटात स्वतःचे महत्त्व वाढवण्यासाठी किंवा टोळीत सामील होण्यासाठी, मोठ्या गुन्हेगारांनी आपल्याला जवळ करावे म्हणून सुद्धा काही नवोदित तरुण गुन्हेगार शस्त्रे बाळगतात.

**क्षणिक आवेग आणि विचारधारेचा अभाव :** अनेकदा तरुण वयात परिणामांचा विचार न करता, केवळ तात्कालिक आवेशात किंवा चुकीच्या विचारसरणीच्या प्रभावाखाली येऊन शस्त्रे बाळगली जातात. असे करणे बेकायदेशीर आहे, समाजविघातक आहे याची जाणीव त्यांना नसते.

**अमली पदार्थ मिळण्याचे स्रोत:** अमली पदार्थांचे तस्कर आणि स्थानिक विक्रेते अशा मुलांना आपलं हक्काचं गिऱ्हाईक बनवतात. हे तस्कर शाळा, कॉलेज आणि तरुणांच्या इतर गर्दीच्या ठिकाणी आपले जाळे पसरवतात. काही वेळेस डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय मिळणाऱ्या किंवा विशिष्ट प्रकारच्या रासायनिक घटकांचा समावेश असलेल्या औषधांचा (उदा. व्हाईटनरमधील ट्रायक्लोरोइथेन, आयोडेक्स, काही कफ सिरप) गैरवापर नशेसाठी केला जातो.

**ताण-तणाव आणि नैराश्य:** प्रतिष्ठेचे खोटे प्रतीक म्हणून व्यसन करणे हा आजकाल ट्रेंड झाला आहे. तरुण अमली पदार्थांचे सेवन करणे हे फॅशन किंवा उच्चभ्रू समाजाचे लक्षण समजतात. सिनेमा, वेब सिरीज, व्हीडिओ किंवा सोशल मीडियावरील चुकीच्या चित्रणामुळेही हा गैरसमज पसरतो.

**नशेच्या पदार्थांची सोपी उपलब्धता:** अमली पदार्थांच्या माफियांकडून जाणीवपूर्वक व्यसन लावणे याचे प्रमाण देखील वाढलेले आहे. काही टोळ्या तरुणांना सुरुवातीला मोफत किंवा कमी किमतीत अमली पदार्थ देऊन त्यांना व्यसनाधीन बनवतात. एकदा नशेच्या आहारी गेल्यावर स्वतःवर नियंत्रण गमावल्यावर आणि हातात शस्त्र असल्यावर ही अर्धवट वयाची पोर स्वतःला हिरो समजू लागतात.

काहीवेळा स्वतःच्या मनात असलेली भीती किंवा असुरक्षिततेची भावना लपवण्यासाठी किंवा त्यावर मात करण्यासाठी तरुण शस्त्रे बाळगतात. आक्रमकता आणि राग ही सुद्धा मुलांना हत्यार वापरायला प्रेरित करतात.

भावनिक अस्थिरता आणि मानसिक विकृती हा पण लक्षात घेण्यासाठी महत्त्वाचा मुद्दा आहे. काहीवेळा भावनिक अस्थिरता, मानसिक आजार किंवा व्यक्तिमत्त्व विकृती यांमुळे व्यक्ती हिंसक होऊ शकते आणि शस्त्रांचा वापर करू शकते.

बाल गुन्हेगारी, शस्त्रांचा वापर आणि अमली पदार्थांचे व्यसन या समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी व्यापक आणि बहुस्तरीय उपाययोजना करणे आवश्यक आहे.

कौटुंबिक स्तरावर पालकांनी मुलांशी संवाद साधणे, मोकळा संवाद साधणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे महत्त्वाचे आहे. मुलांच्या सवयी, मित्र-संगत आणि त्यांच्या वागणुकीतील बदलांवर पालकांनी बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

शैक्षणिक स्तरावर जागरूकता कार्यक्रम राबवणे, शाळा आणि कॉलेजांमध्ये शस्त्रांचे आणि अमली पदार्थांचे दुष्परिणाम, कायदेशीर बाबी आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे, सल्ला, मार्गदर्शन केंद्रे यांची मदत घेणे महत्वाचे आहे.

सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग यामध्ये मदत करू शकतो. या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक आणि स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या माध्यमातून जनजागृती आणि व्यसनमुक्तीचे कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे.

कायदेशीर आणि प्रशासकीय स्तरावर बाल न्याय मंडळाची प्रभावी भूमिका आहे. बाल गुन्हेगारांच्या बाबतीत बाल न्याय मंडळाने संवेदनशीलतेने योग्य कारवाई करावी, जेणेकरून त्यांना सुधारण्याची संधी मिळेल.

या समस्यांवर मात करण्यासाठी पालक, शिक्षक, समाज, शासन आणि स्वतः तरुण पिढी या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. योग्य वेळी योग्य हस्तक्षेप आणि मदतीमुळे अनेक तरुणांना चुकीच्या मार्गावर जाण्यापासून वाचवता येऊ शकते.

**meenonline@gmail.com**

# योनी व गर्भाशय घसरण

(Vaginal Uterine Prolapse)

गर्भाशय घसरण, ज्याला वैद्यकीय भाषेत "यूटेरिन प्रोलॅप्स" (Uterine Prolapse) असे म्हणतात, ही स्त्रियांमध्ये आढळणारी एक सामान्य पण दुर्लक्षित समस्या आहे. अनेक वेळा स्त्रिया लाज किंवा भीतीमुळे याची योग्य वेळी माहिती देत नाहीत, परिणामी त्रास अधिक वाढतो. एक स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून मी यावर जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न करते. या लेखामध्ये आपण गर्भाशय प्रोलॅप्सची कारणे, लक्षणे, निदान, उपचार व प्रतिबंधात्मक उपाय यांचा सविस्तर आढावा घेणार आहोत.

**गर्भाशय प्रोलॅप्स म्हणजे काय?**

गर्भाशय प्रोलॅप्स म्हणजे गर्भाशय (uterus) हे त्याच्या नैसर्गिक स्थितीतून खाली सरकून योनीमार्गात (vagina) येणे. हे सरकणे सौम्य, मध्यम किंवा तीव्र स्वरूपाचे असू शकते. काही गंभीर प्रकरणांमध्ये गर्भाशय पूर्णपणे योनीच्या बाहेर येतो, याला "पूर्ण प्रोलॅप्स" (complete prolapse) म्हणतात.




**गर्भाशय प्रोलॅप्सची कारणे**

गर्भाशयास योग्य ठिकाणी धरून ठेवणाऱ्या स्नायू व लिगामेंट्स जर कमकुवत झाल्या, तर ही समस्या उद्भवू शकते. हे कमकुवतपण विविध कारणांमुळे होऊ शकते:

१. Complicated or multiple child-births-वारंवार होणारी व अवधी प्रसूती हे प्रमुख कारण असते.

२. वाढलेले वय आणि रजोनिवृत्ती (Menopause)-इस्ट्रोजेनच्या पातळीत घट झाल्यामुळे स्नायू कमजोर होतात.

३. गर्भावस्थेदरम्यानचा अति ताण

४. जास्त वजन उचलणे, दीर्घकाळ खोकला किंवा बद्धकोष्ठता

५. जास्त वजन (Obesity)


**लक्षणे**

गर्भाशय प्रोलॅप्सची लक्षणे तीव्रतेवर अवलंबून असतात. सौम्य प्रोलॅप्समध्ये कोणतीही लक्षणे दिसू नयेत, पण तीव्र स्वरूपात खालीलप्रमाणे त्रास होऊ शकतो:

- योनीत जडपणा किंवा दाब जाणवणे
- योनीतून काहीतरी बाहेर येतेय अशी जाणीव
- लघवी करताना अडथळा, जळजळ किंवा वारंवार लघवी होणे
- लैंगिक संबंधात वेदना
- पाठदुखी, कंबरदुखी
- चालताना किंवा उभे राहिल्यावर त्रास वाढणे

**निदान**

रोगनिदान मुख्यतः वैद्यकीय तपासणीवर आधारित असते. एक साधी पेल्विक चाचणी (pelvic examination) यामध्ये खूप उपयुक्त ठरते. काही वेळा अधिक सखोल माहितीसाठी अल्ट्रासोनोग्राफी किंवा MRI चाचण्या वापरल्या जातात.




**उपचार**

उपचार पद्धती प्रोलॅप्सच्या टप्प्यावर (degree of prolapse), रुग्णाच्या वयावर, भविष्यातील गर्भधारणेच्या इच्छेवर व एकूण आरोग्यावर आधारित असतात.

१. औषधोपचार व व्यायामः

- सौम्य प्रोलॅप्ससाठी "किगेल्स व्यायाम" (Kegel exercises) अतिशय उपयुक्त असतो. हे व्यायाम पेल्विक स्नायूंना बळकट करतात.
- काही वेळा इस्ट्रोजेन क्रीम्स वापरून योनीतील ऊतक बळकट केले जातात.

२. पेसरी (Pessary):

- योनीमध्ये घालण्याजोगे एक उपकरण जे गर्भाशयाला योग्य ठिकाणी धरून ठेवते.
- ही शस्त्रक्रियेचा पर्याय असू शकतो, विशेषतः वयोवृद्ध स्त्रियांसाठी.

३. शस्त्रक्रिया (Surgery):

- गंभीर प्रोलॅप्समध्ये शस्त्रक्रिया हाच एकमेव पर्याय उरतो.
- यामध्ये "हिस्टेरेक्टॉमी" (गर्भाशय काढून टाकणे) केली जाऊ शकते.
- नवीन तंत्रज्ञानानुसार काही शस्त्रक्रिया योनीमार्गातून किंवा लेप्रोस्कोपिक पद्धतीने केल्या जातात.

**प्रतिबंधक उपाय**

- नियमित पेल्विक फ्लोअर व्यायाम
- प्रसूतीदरम्यान काळजीपूर्वक आणि सुरक्षित वातावरण
- दीर्घकाळ बद्धकोष्ठता टाळणे
- सतत वजन उचलणे टाळणे
- आहारामध्ये फायबर आणि पाणी पुरेसे घेणे
- वयोमानानुसार नियमित तपासणी

**निष्कर्ष**

गर्भाशय प्रोलॅप्स ही एक शारीरिक त्रासदायक आणि मानसिकदृष्ट्याही क्लेशदायक अवस्था असू शकते. मात्र याबाबत लाज न बाळगता योग्य वेळी स्त्रीरोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे. योग्य उपचार, आहार, व्यायाम आणि मानसिक तयारी यामुळे अनेक स्त्रिया यावर यशस्वीरित्या मात करू शकतात. आपल्या शरीराची काळजी घेणे हे आपले कर्तव्यच आहे, आणि त्यात कोणतीही लाज वाटण्याचे कारण नाही.

**drsnehalspatil@gmail.com**

# 'या' फळांच्या साली चेहऱ्याला ठेवतील टवटवीत!

आपण आजारी पडल्यावर आपल्याला फळे खाण्याचा सल्ला दिला जातो. आपण आपल्या आवडीची फळे खातो देखील पण फळे खाल्ल्यानंतर आपण अनेकदा त्याची साल कचऱ्याच्या डब्यात फेकून देतो. मात्र तुम्हाला हे माहिती आहे का की फळं तुमच्या आरोग्यासाठी आणि त्वचेसाठी जितकी फायदेशीर आहेत तितकीच त्यांची साल देखील फायदेशीर आहे. ज्याचा वापर करून तुम्ही तुमच्या चेहऱ्याचे सौंदर्य वाढवू शकता.




उन्हाळ्यात सूर्यप्रकाश, धूळ आणि प्रदूषणामुळे त्वचेवर टॅनिंग, सनबर्न, डलनेस यासारख्या अनेक समस्या उद्भवतात. त्यामुळे, तुम्ही बाजारातून केमिकलयुक्त उत्पादने खरेदी करणे, तर



थांबवालच पण सोबतच तुमच्या त्वचेवर या केमिकल्समुळे होणाऱ्या दुष्परिणामांपासूनही तुम्हाला आराम मिळेल. प्रत्येक महिलेला चमकदार आणि डागरहित त्वचा हवी असते आणि त्यासाठी बहुतेक महिला महागड्या सौंदर्यप्रसाधनांचा वापर करतात. पण, जर आम्ही तुम्हाला सांगितले की अशा समस्या फक्त काही नैसर्गिक वस्तूंनी सोडवता येतात तर? बरं, हा लेख स्वयंपाकघरातील घटकांसह त्वचेची काळजी घेण्यासाठी टिप्सबद्दल नाही, तर काही सोप्या फळांच्या सालींच्या मदतीने चमकदार त्वचा मिळविण्याबद्दल आहे. ही साले तुमच्या त्वचेसाठी खूप फायदेशीर मानली जातात आणि चेहऱ्यावर त्वरित चमक आणू शकतात. चला तर मग जाणून घेऊया या लेखातून अशी कोणती फळे आहेत ज्यांच्या साली आपण स्किन केअर रूटीनमध्ये समाविष्ट करू शकतो.

### संत्र्याच्या सालीची कमाल

संत्र्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि नैसर्गिक तेल भरपूर प्रमाणात असते, जे एक चांगले एक्सफोलिएटर मानले जाते.



जेव्हा तुम्ही संत्र्याच्या सालीचा वापर करता तेव्हा ते मुरुमे, काळे डाग कमी करण्यास मदत करते आणि कोलेजन तयार होण्यास मदत करते. यासाठी, सर्वप्रथम संत्र्याची साल वाळवा आणि त्याची पेस्ट बनवा, त्यात दही घाला, त्यात २ चमचे कोरफडीचे जेल आणि लिंबाचा रस घाला. मग ही पेस्ट चेहऱ्यावर १५ ते २० मिनिटे लावून चेहरा धुवून टाका.

### पपईची साल देईल चमकदार त्वचा

पपईची साल उन्हात वाळवून त्याची पावडर बनवा, नंतर त्यात मध आणि लिंबाचा रस मिसळून फेसपॅक बनवा.



आता ते १५-२० मिनिटे चेहऱ्यावर लावा आणि नंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा. कारण पपईच्या सालीमध्ये पपेन नावाचे एंजाइम असते, जे टॅनिंग कमी करण्यास मदत करते. पिंपल्स घालवण्यास मदत करते, त्वचेला उजळ बनवते आणि तिला मऊ देखील करते. काळे डाग कमी करण्यासाठी तुम्ही आठवड्यातून २-३ वेळा ते वापरू शकता.



### डाळिंबाची साल आहे त्वचेसाठी वरदान

डाळिंबाच्या सालीचा फेसपॅक म्हणून वापर करण्यासाठी, साली उन्हात वाळवा आणि मिक्सरमध्ये बारीक करून त्याची पावडर बनवा आणि गुलाब पाण्यात मिसळा आणि चेहऱ्याला १० मिनिटे लावा. तुमची त्वचा चमकदार आणि सॉफ्ट होईल.

### किवीची साल चेहऱ्याला ठेवेल टवटवीत

अँटीऑक्सिडंट्स आणि 'व्हिटॅमिन सी'ने समृद्ध असलेल्या किवीचे साल तुमच्या त्वचेची चमक वाढवू शकते.



ते वापरण्यासाठी, किवीची साल तुम्ही चेहऱ्याला लावून मसाज करू शकता किंवा किवीच्या सालीची पेस्ट बनवा त्यात एक चमचा दही मिसळा. हे मिश्रण डोळ्यांना टाळून तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि १५ मिनिटे तसेच राहू द्या. किवीमधील नैसर्गिक आम्ल मृत त्वचेच्या पेशी काढून टाकतात, रंग उजळवतात आणि निरोगी चमक देतात. ताजेतवाने, चमकदार त्वचा दिसण्यासाठी कोमट पाण्याने हळूवारपणे धुवा.

### केळीची साल उजळवेल त्वचा

केळीच्या सालीच्या पांढऱ्या तंतूंमध्ये कोरफडीचे जेल मिसळा आणि ते डोळ्यांखाली लावा, यामुळे डार्क सर्कलच्या समस्येपासून आराम मिळतो



किंवा केळीच्या सालीवर थोडी हळद आणि मध घ्या आणि चेहऱ्यावर लावून मसाज करा. १५-२० मिनिटे तसेच ठेऊन नंतर चेहरा धुवा. केळीच्या सालीमध्ये अँटीऑक्सिडंट्स आढळतात जे डाग कमी करण्यास मदत करतात आणि सूज, मुरुम, जळजळ इत्यादी त्वचेच्या समस्या कमी करतात.

# सेवाव्रती डॉक्टर

महिलांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या, हजारो महिलांना आरोग्यदायक सकारात्मक दृष्टिकोन देऊन नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढत आशेचे सोनेरी किरण दाखवणाऱ्या, एक उत्कृष्ट ऑक्युपेशनल थेरपिस्ट, फिजिओथेरपिस्ट आणि योग तज्ञ, समाजकार्यासाठी अविरत वाहून घेतलेल्या "सेवाव्रती" डॉक्टर अंजली शरद गांगल यांच्या प्रेरणादायी जीवन प्रवासाबद्दल आज आपण जाणून घेणार आहोत.

उत्तम नेतृत्व गुण, निर्भिडता, स्पष्टवक्तेपणा, जबाबदारी या सगळ्या संस्काराचे बाळकडू घरातूनच मिळालेल्या अंजलीताईंनी मेडिकल क्षेत्रातच करिअर करण्याचा निर्णय घेतला. शाळेत असताना अभ्यासासोबत बॅडमिंटन आणि चित्रकला यात देखील त्यांनी त्यांची चुणूक दाखवली. गिरगावातील शाळेतच बेस्ट स्टुडन्ट ऑफ स्कूल हा पुरस्कार स्वीकारताना त्यांच्या मनात योग साधनेचे बीज रोवले गेले

योग थेरपीमध्ये मुंबई विद्यापीठातून प्रगत डिप्लोमा, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक येथून M.A. (योगशास्त्र)ची पदवी देखील संपादन केली.

महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होताच सामाजिक कार्यातील उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांचे लग्न सामाजिक कार्याचे व दानाचे महत्त्व जाणणारे, उच्च विद्याविभूषित ह्यूमन रिसोर्स डेव्हलपमेंट मधील तज्ज्ञ शरद गांगल (आत्ता ठाणे जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष आहेत) यांच्याशी झाले. लग्नानंतर त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत आणि सामाजिक कार्याच्या वाटचालीत मुलांच्या संगोपनात शरदजींसोबतच मोठे दीर, जाऊ, सासू-सासरे एकत्र कुटुंब पद्धती या सगळ्या सपोर्ट सिस्टीमने महत्त्वाची भूमिका बजावली.

पाश्चिमात्य देशांकडून आलेलं आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान आणि पौर्वात्य म्हणजे भारतातील योग-अध्यात्म हे भारतीय समाजाच्या उद्धारासाठी एकत्रित आचरणात आणले पाहिजेत, हा विवेकानंदांचा विचार हृदयात खोलवर रुजला. त्यातूनच रुग्णांसाठी फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी आणि योग थेरपी या तीनही शास्त्रांचा एकत्रित वापर करून समग्र उपचार पद्धतीचा अवलंब रुग्णांसाठी केला. त्याचा रुग्णांना




सांधेदुखीच्या उपचारांमध्ये अतिशय उपयोग झाला. त्यांचे सर्वात मोठे कार्य हे ठाण्यातील महिलांसाठी एकत्रित योग आणि फिजिओथेरपीचे विशेष वर्ग आयोजित करण्याचे आहे.

गेली १५ वर्षे, डॉ. अंजली ताईंनी ३५०० हून अधिक महिलांना योग व फिजिओथेरपीच्या सहकार्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत सात वर्षे सक्रिय कार्यकर्ता म्हणून कार्य केले. १९८३ ते १९८६ पर्यंत त्यांनी कोल्हापूर येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून कार्य केले. २००३ पासून, ठाणे येथील घंटाळी मित्र मंडळात त्यांनी योग विभागात स्वयंसेवी सेवेस प्रारंभ केला.

तरुण वयातच अभाविपमध्ये काम करताना मनामध्ये रुजलेला सामाजिक बांधिलकीचा वारसा आयुष्याच्या प्रत्येक वळणावर जपत असताना, दहा वर्षे त्यांनी तळागाळातील गरजू विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या सेवा सहयोग फाऊंडेशन या संस्थेच्या कार्यास स्वतःला वाहून घेतले. या संस्थेमार्फत आर्थिकदृष्ट्या वंचित असलेल्या वस्त्यांमध्ये वाढणाऱ्या मुलांना हसत खेळत शिक्षण देण्यासाठी अभ्यासिका चालवणे, त्यांना शिक्षण उपयोगी सामुग्री उपलब्ध करून देण्याचे कार्य केले.

आजच्या घडीला ठाण्यातील तीन पेट्रोल पंप येथील विद्या भवन वसतिगृहातील ५० मुलांच्या आवश्यक त्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि अभिनव क्रियाशीलतेतून त्यांना समाजात आत्मविश्वासाने उभे करण्यास सहाय्यभूत होण्यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. पर्यावरण संरक्षणासाठी खत निर्मितीचे मशीन स्वतःच्या कॉम्प्लेक्समध्ये घेण्याबाबत पुढाकार घेऊन खत निर्मिती केली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघात त्या महिला समन्वयक अशी जबाबदारी पार पाडत आहेत. याच स्वयंसेवक संघाकडून प्रसिद्धी निष्काम कर्मयोग या कार्यपद्धतीचे संस्कार झालेल्या अंजलीताईंना आपण करत असलेल्या कार्याची कुठेही वाच्यता न करता, प्रसिद्धी माध्यमांपासून दूर राहून सेवाभाव जपण्यासाठी त्या कायम प्रयत्नशील असतात. त्यांची ही मुलाखत देखील खूप विनंती केल्यानंतर त्यांनी दिली आहे. पुरस्कारांविषयी त्यांच्याशी चर्चा करताना सन्मानित पुरस्कारांसाठी त्यांचा बायोडेटा मागवलेला असताना त्यांनी विनम्रपणे दुसऱ्यांचे नाव सुचवून आणि स्वतःचे नाव त्या पुरस्कारांच्या यादीतून बाहेर काढले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये अनेक महिला धडपडत असतात त्याच महिलांचा या पुरस्कारांवर खरा अधिकार असतो असं त्या प्रांजळपणे म्हणतात.

अल्पशिक्षित असूनही आदर्शवत जीवन जगणारे आई-वडील, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे संस्थापक कै. यशवंतराव केळकर, घंटाळी मित्र मंडळाचे कै. गुरुवर्य अण्णा व्यवहारे, तिसरी म्हणजे कर्मसंन्यास दीक्षा देणारे बिहार योग विद्यालयाचे स्वामी निरंजनानंद सरस्वती, आजच्या जीवनातही चालते बोलते संत म्हणून डॉ. श्रीराम आगाशे यांसारखे गुरू जीवनात लाभणं यात मी स्वतःला भाग्यवान समजते. यातूनच त्यांचा गुरूप्रीत्यर्थ असणारा सविनय आदर समजतो. समाजकार्याचे हे संस्कार त्यांचा मुलगा कुणाल आणि मुलगी श्रुती या दोघांमध्ये आपसूकच रुजले आहेत स्वतःच्या पगारातील काही भाग समाजासाठी देत गांगल घरातील सेवाभावी वृत्तीने दान करण्याचा वारसा दोघांनीही जपला आहे.

कोणत्याही सामाजिक कार्याची सुरुवात ही स्वतःपासूनच केली पाहिजे असं अंजलीताई आवर्जून सांगतात. अहंकाराचा स्पर्श न होता आपल्याकडे उपलब्ध असलेला वेळ, शारीरिक शक्ती, वस्तू, कला, संपत्ती, ज्ञान हे सहजतेने ज्यांना हवे त्यांना उपलब्ध करून देणे म्हणजे समाजसेवा. आणि समाजसेवेचे फलित काय? तर रोज समाधानाने अत्यंत शांत झोप लागून जीवन आनंदी बनते. हाच त्यांच्या निरोगी जीवनाचा फंडा.




डॉ. अंजलीताई यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान हे समस्त महिलांसाठी प्रेरणा देणारे आहे. अशा सातत्याने नवनवीन माणसं जोडण्याची कला अवगत असणाऱ्या, संवादातून उत्तम समन्वय साधणाऱ्या, अत्यंत विनम्रतेने त्यांच्या उत्तम निरीक्षण शक्तीने इतरांतील गुण अचूक हेरणाऱ्या, समाजकार्यात कायम अग्रेसर असणाऱ्या या कर्मयोगीनीचे हे कार्य असेच अखंड अविरत चालू राहो व त्यांच्या या कार्याचा वटवृक्ष असाच दिवसागणिक बहरत राहो या सदिच्छेसह खूप शुभेच्छा.

**Vaishu.gaikwad78@gmail.com**

# मुद्रा-भाग २

मागील भागात आपण सिंहमुद्रेविषयी जाणून घेतले. या भागात ब्रह्ममुद्रा या करायला सोप्या, पण अतिशय परिणामकारक अशा मुद्रेविषयी आपण जाणून घेणार आहोत.

**ब्रह्ममुद्रा -**

मस्तक आणि शरीराचा खांद्यांच्या खालचा भाग यांना जोडणारा अवयव म्हणजे मान आणि गळा. या भागात अन्ननलिका, श्वासनलिका, कानाकडून, मुखाकडून आणि नाकपुड्यांकडून येणारे मार्ग एकत्र येतात.



म्हणून या भागाला 'सप्तपथ' असे नाव आहे. याच भागात पडजीभ आणि टॉन्सिलसही असतात. मानेकडच्या मागच्या बाजूस मज्जारज्जू, मस्तकाकडून येणारे ज्ञानतंतू, रक्तदाब आणि हृदयाचे ठोके नियंत्रित करणाऱ्या नसा, स्वरयंत्र तसेच कंठग्रंथी म्हणजे थायरॉइड ग्लांड्स असे विविध महत्त्वाचे शरीराचे भाग आहेत. त्यामुळे या भागांचं आरोग्य जपणं अत्यंत महत्त्वाचं आहे. यासाठी मागील लेखात विस्तारानं सांगितलेली सिंहमुद्रा तसेच दत्तमुद्रा आणि ब्रह्ममुद्रा यांचा फार उपयोग होतो. ब्रह्मदेवाची मुखं ज्याप्रमाणे चार दिशांना असतात त्याप्रमाणे ब्रह्ममुद्रेच्या कृतीत चेहरा उजवीकडे, डावीकडे, वर आणि खाली अशा चार दिशांना वळवला जातो. म्हणून या मुद्रेला ब्रह्ममुद्रा असं म्हणतात.

**कृती -**

१. पद्मासन, वज्रासन किंवा सुखासनात म्हणजे साधी मांडी घालून बसावं. खाली बसता येत नसेल तर खुर्चीत बसून अथवा पायांत अंतर ठेऊन कमरेवर हात ठेऊन उभं राहूनही ही मुद्रा करता येते.

२. मान, खांदे, पाठकणा समस्थितीत ठेवावा.

३. चेहरा हळूहळू उजवीकडे न्यावा. हनुवटी खांद्याच्या पातळीला येईल इतकी न्यावी.

४. दृष्टी उजव्या बाजूस न्यावी किंवा डोळे अलगद मिटून घ्यावेत.

५. या स्थितीत दोन-तीन श्वास थांबून मान पुन्हा पूर्वस्थितीला म्हणजे मध्यभागी आणावी.

६. याच पद्धतीनं चेहरा डाव्या बाजूस न्यावा. दृष्टी या बाजूला वळवावी किंवा डोळे अलगद मिटून घ्यावेत. मान पुन्हा पूर्वस्थितीला आणावी.

७. यानंतर मान मागच्या बाजूला जितकी खाली जाईल तितकी जाऊ द्यावी. मात्र खांदे आणि कमरेतून मागे झुकू नये. खांदे, कंबर ताठच ठेवावी. या अंतिम स्थितीमध्ये जबडा एकमेकांवर मिटलेला असेल अशी काळजी घ्यावी जेणे करून गळ्यावर पूर्ण ताण येईल. पूर्वस्थितीला यावं.

८. यानंतर मान आणि गळा सैल करून मस्तक पुढच्या बाजूस झुकवावं आणि हनुवटी छातीला टेकवण्याचा प्रयत्न करावा. दृष्टी खालच्या बाजूस वळवून स्थिर करावी. मस्तक पुढं नेताना खांदे, छाती किंवा कमरेत झुकवू नये.

वरील चारही अवस्थांमध्ये तीन ते पाच श्वास थांबावं.

या चारही कृतींमध्ये मान आणि कंठ यावर आलटून पालटून दाब आणि ताण येतो. ही मुद्रा करतांना चित्त पूर्ण एकाग्र करून या दाब आणि ताणाचा अनुभव घेणं आवश्यक आहे.

या चारही कृती केल्यानंतर ब्रह्ममुद्रेचं एक आवर्तन पूर्ण होतं.

**लाभ :** १. मान आणि कंठ प्रदेशातील स्नायूंना ताण आणि संकोच होत असल्यामुळे हे दोन्ही अवयव लवचिक आणि दृढ होतात.




२. मेंदूकडून ज्ञानेंद्रियांकडे जाणारे ज्ञानतंतू कार्यक्षम होतात.

३. टॉन्सिल्सवरील सूज तसेच टॉन्सिल्सची अनावश्यक वाढ रोखण्यासाठी या मुद्रेचा उपयोग होतो.

४. थायरॉईड या अंतःस्त्रावी ग्रंथींचं कार्य योग्य रीतीनं होते.


५. रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी ही मुद्रा अतिशय लाभदायक आहे.

करायला सोपी असलेली ही मुद्रा म्हणजे आरोग्याच्या दृष्टीनं मोठं वरदान आहे. नित्य साधनेमध्ये या मुद्रेचा अंतर्भाव केलाच पाहिजे. **निषेध :** मानेचे गंभीर आजार असतील अथवा घशाला सूज असेल तर ही मुद्रा करणं टाळावं.

**दत्तमुद्रा -**

स्पॉंडिलायसिस सारखे मानेचे विकार असतील तर ब्रह्ममुद्रेऐवजी दत्तमुद्रा करावी.

ब्रह्ममुद्रेमधील पुढच्या बाजूला मान झुकवण्याची क्रिया वगळली तर दत्तमुद्रा होते. दत्तगुरूंच्या मूर्तीमध्ये



तीन दिशेला मुखं असतात. या मुद्रेमध्येही मान तीन दिशांना म्हणजे उजवीकडे, डावीकडे आणि वरच्या दिशेला वळवली जाते. म्हणून या मुद्रेला 'दत्तमुद्रा' म्हणतात. वर सांगितल्याप्रमाणे तीन दिशांना मान वळवल्यावर एक आवर्तन पूर्ण होतं. ब्रह्ममुद्रेचे लाभ दत्तमुद्रेनेही प्राप्त होतात.

**शारीर मुद्रा -**

आतापर्यंत आपण हस्तमुद्रा आणि मस्तक ते कंठापर्यंतच्या अवयवांशी संबंधित मुद्रा पाहिल्या. यानंतर शारीर अथवा कायिक म्हणजे प्रामुख्याने छाती, पोट या अवयवांशी संबंधित काही निवडक मुद्रा पाहणार आहोत. या मुद्रांमध्ये अंतिम स्थितीचं आसनांशी साम्य दिसतं परंतु आसनांपेक्षा मुद्रांचं वेगळेपण हे की मुद्रांमुळे अंतःस्त्रावी ग्रंथींच्या कार्याला प्रेरणा मिळते आणि त्या अधिकाधिक कार्यक्षम होतात. शारीरमुद्रांमध्ये योगमुद्रा, विपरीतकरणीमुद्रा, तडागीमुद्रा सामान्यतः केल्या जातात. या मुद्रांची माहिती पुढील लेखात पाहू.

# मटकी-भेळ टॉर्टिया बाईट्स

मराठी घरात भेळ म्हणजेच चवदार, तिखट-गोडसर आणि थोडा आंबट असा चवींचा धमाका. त्यात जर मटकीसारखा पौष्टिक आणि पारंपरिक घटक घालायचा तर रेसिपी केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यदायीही होते.

टॉर्टिया चिप्सचा कुरकुरीतपणा आणि दही-साखर-शेवच्या सौम्यतेने याला एक ग्लोबल टच मिळतो, ज्यामुळे पारंपरिक भेळ अधिक आकर्षक आणि सगळ्यांसाठी सहज खाण्यायोग्य होते. ही रेसिपी पाहुण्यांना दिल्यास, तुम्हाला सोपी, पौष्टिक आणि डिश खाऊ घातल्याचा आनंद नक्कीच मिळेल.




**साहित्य :**

- मोड आलेली मटकी १ कप
- तुकडे केलेला कांदा १ मध्यम
- बारीक चिरलेला टोमॅटो १ मध्यम
- कोथिंबीर (चिरलेली) २ टेबलस्पून
- चिंच-गूळ चटणी (मिठ्ठी-आंबट मिश्रण ३-४ टेबलस्पून
- दही (फेटलेले) १/२ कप
- टॉर्टिया चिप्स / पापडी १ मोठा वाटी
- शेव १/४ कप
- मीठ आणि मिरची पूड चवीनुसार



**कृती :** मोड आलेली मटकी स्वच्छ धुवून उकळत्या पाण्यात १५-२० मिनिटं शिजवा. (मऊसर होईपर्यंत).

एका मोठ्या वाडग्यात उकडलेली मटकी, कांदा, टोमॅटो, कोथिंबीर घाला. त्यात मीठ, मिरची पूड आणि चिंच-गूळ चटणी मिसळा.

फेटलेले दही हळूवारपणे भेळ मिश्रणात घाला आणि नीट मिक्स करा. दही मिक्स केल्याने चव सौम्य आणि थोडीशी थंडसर होते.

सर्व्हिंग प्लेटमध्ये टॉर्टिया चिप्स (किंवा पापडी) थोडीशी ठेवून त्यावर तयार भेळ चा एक चमचा थोडक्यात ठेवा.



**सजावट :**

- भेळवर शेव घाला. शेवमुळे कुरकुरीतपणा येतो पदार्थ सुंदर दिसतो.
- टॉर्टिया bites पटकन सर्व्ह करा, अन्यथा चिप्स मऊ पडू शकतात.
- पौष्टिकता आणि फायदे:
- मटकी: प्रथिने आणि फायबरने समृद्ध, पचनासाठी मदत करणारी.
- चिंच-गूळ चटणी: नैसर्गिक स्वीटनर व आंबटसर चव देणारी, जी पचन सुधारते.
- दही: प्रोबायोटिक्सचा उत्तम स्रोत, पचनाला सुधारणा.
- टॉर्टिया चिप्स: कमी तेल वापरून किंवा घरच्या बनवलेल्या वापरल्यास अधिक पौष्टिक.

**टिप्स :** घरगुती टॉर्टिया चिप्स करायचे असल्यास, गहू किंवा मक्याच्या तांदळाच्या पिठापासून तयार करावे.

# प्रकाश दादा सोळंके अपयशी ठरले!

**बोंबला** | **सोळंके कॉम्प्लेक्ससमोर पाणीच पाणी**

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:शहरातील मेन रोड वरील प्रत्येक बिल्डिंग मालकाने त ळग्रहात गाळे काढून आपले उत्पन्न वाढवले त्यास माजलगाव नगरपालिकेने परवानग्या दिल्या मात्र सदर अंडर ग्राउंड गाळ्याची स्वछता कोण करनार मुळे डासाचा प्रदुर्भाव वाढून दूकानदार व ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे त्या मुळे माजलगाव नगर पालिकेने वेळीच लक्ष घालून संबंधितला नोटीस पाठवून स्वछता मोहीम राबववी अशी मागणी व्यापारी व ग्राहक वर्गातून केली जात आहे

माजलगाव शहर व ग्रामीण विभाग जिल्यात सधन विभाग म्हणून ओळखला जातो त्या मुळे येथील बाजार पेठेत रोज मोठी उलढाल होते त्या अनेक तरुणांनी आपला व्यवसाय चांगल्या प्रकारे व्हा वा म्हणून अनेकांचा मुख्य रस्त्यावरच दुकान थाटण्याचा अट्टाहास असल्यामुळे मुख्य रस्त्यावरील प्रत्येक बिल्डिंग मालकाने तळघरात गाळे काढले आहेत त्यामुळे जागा मिळेल तिथे तरुण वर्ग आपला व्यवसाय थाटत चालू आहे मात्र माजलगाव शहरातील मुख्य रस्त्याची उंची वाढल्याने आणि रोड लगतच्या नाल्या तुंबल्याने पाणी आणि दुर्गंधीयुक्त नाल्यातील पाणी मुख्य रस्त्यालगतच्या सर्व तळघरातील गळ्यात व मुख्य रस्त्यावर साचत असल्यामुळे व्यापारी आणि ग्राहकाच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे त्यामुळे नगरपालिकेने वेळीच पावसाळ्यापूर्वीच स्वच्छता अभियान राबवून गाळा धारकांचे आणि ग्राहकांचे आरोग्य अबाधित ठेवावे अन्यथा नगरपालिकेला मोठ्या आंदोलनाला सामोरे जावे लागण्याची चिन्ह दिसत आहेत.

### ...अन्यथा आंदोलन करणार: विठ्ठल सोळंके

माजलगाव शहरातील मुख्य रस्त्या आजूबाजूला अनेक बिल्डिंगमध्ये तळघरात गाळे निर्माण केलेले आहेत मुख्य रस्त्यावरील नाल्यातूनल्यामुळे हे सर्व पाणी गळ्यात व मुख्य रस्त्यावर शीरत आहे त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी निर्माण होत आहे यामुळे व्यापारी आणि ग्राहक वर्गाच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे नगरपालिकेने वेळीच लक्ष देऊन मान्सून पूर्व स्वछता करावी अन्यथा न. प समोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा विठ्ठल सोळंके यांनी दिला आहे




### जनतेच्या आरोग्याशी खेळ:डॉ. बांडगे

माजलगाव शहरात सर्वत्र दुर्गंधीचे साम्राज्य आहे जिकडे तिकडे कचऱ्याचे ढीग आहेत पाऊस पडल्यावर अंडरग्राउंड गाळ्यात नालीचे पाणी जात आहे त्यामुळे व्यापारी आणि ग्राहकांना नाहक डासांचा त्रास सहन करावा लागत आहे डासामुळे डेंगू, मलेरिया सारखे आजार वाढत आहेत त्यामुळे नगरपालिका जर माजलगाव शहरातील जनतेच्या आरोग्याशी खेळ खेळत असेल तर जनतेने कर का भरावा अशा प्रश्न डॉक्टर बाडगे यांनी उपस्थित केला तर पावसाळ्यात रस्त्याने नीट चालता ही येत नाही प्रत्येकाला गुडघ्याच्या वर आपले कपडे सरकावे लागत असतील तर ही नगरपालिका मुरगडाच म्हणावी लागेल त्यासाठी जनतेने मान्सून पूर्व स्वच्छता करण्यासाठी माजलगाव नगरपालिकेवर दबाव वाढवण्याची गरज असल्याचे सांगितले

**प्रकाश सोळंकेंचे धोरण म्हणजे :** निवडणुका आल्या की मोठा गाजावाजा करत. जनतेला अनेक आश्वासन द्यायची निवडणुकीत एक नव्हे तर अनेक आश्वासनाची खैरात होते. मात्र एकदा निवडणूक झाल्या. आमदार प्रकाश सोळंके यांची भूमिका म्हणजे आपणा काम बनता भाड मे जाये जनता . या प्रमाणे. दादांचा आमदारकीचा कार्यकाळ चालू आहे. माजलगाव शहराला पुढाऱ्यांचे शहर म्हणून ओळखले जाते मात्र माजलगाव शहरावर स्वच्छतेच्या बाबतीत नगरपालिकेच्या दृष्टी दिसून येत आहे शहरात सर्वत्र कचराच कचरा रस्त्यावर सर्व घाणीचे पाणी पाणी याबाबत मात्र सर्वच पक्षाची पुढारी मुग घेऊन गप्प आहेत तर माजलगाव चे आमदार म्हणून आमदार प्रकाश दादांनी मुख्याधिकारी यांना धारेवर धरून स्वच्छता करून घेणे गरजेचे आहे मात्र तसे होता ना दिसत नाही अनेक व्यापाऱ्यांनी स्वच्छतेच्या बाबतीत आमदार सोळंके यांच्याकडे तक्रार करण्यासाठी प्रयत्न केले मात्र संबंधित याचे फोन न उचलण्याचे काम माजलगाव चे आमदार महोदय करत असलेले सध्याच्या काळात त्यांना जनतेची गरज नसल्याचे दिसून आले

## बीडमध्ये कॉँग्रेसची तिरंगा रॅली

उपक्रम:सैनिकांच्या प्रति सदभावना




पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:पाकिस्तानच्या सततच्या भ्याड हल्ल्याला भारतीय सैन्याने मोठ्या ताकतीने उत्तर देत पाकिस्तानला चार दिवसांत गुडघे टेकायला लावले व भारतीय सैन्याने मिळवलेला हा विजय केवळ सैन्याचा आहे म्हणून भारतीय सैन्याला सलाम करण्यासाठी व भारतीयांची असलेली संवेदना हिच खरी देशभक्ती असून या वीरांच्या पराक्रमाला वंदन करण्यासाठीच कॉंग्रेस पक्षाच्या वतीने तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले होते.

बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून या रॅलीची सुरुवात कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहरातील आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिल्हाधिकारी कार्यालय समोरून जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे कार्यालयात शहीद जवानाच्या प्रति संवेदना व केलेल्या शौर्याला सलाम व्यक्त करत या रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रवीणकुमार शेप, गणेश बजगुडे, श्रीनिवास बेदरे, परवेज कुरेशी, संभाजी पान २ वर

### स्व.राजीव गांधी यांना अभिवादन

आज भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न स्व राजीव गांधी यांचा स्मृतिदिन असल्याने जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या सह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शैक्षणिक यशाची ग्रामस्थांकडून दखल

समारंभ:डॉ.नवनाथ गवळींचा सत्कार




पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील वाठवडा गावातील शेतकरी पुत्र श्री.नवनाथ शारदा विश्वनाथ गवळी यांनी एमबिबिएस पदवी तसेच तुळजापूर उपजिल्हा रुग्णालय येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा २० में रोजी सत्काराचे आयोजित करण्यात आले होते यावेळी गावचे सुपुत्र श्री. आण्णासाहेब(बापु) टेकाळे,श्री. शिवाजी (नाना )टेकाळे,वाठवडा गावचे सरपंच सौ. सुरेखा बालाजी आल्टे,ग्रामपंचायत सदस्य गोपाळ टेकाळे,आकाश पवार यांच्या हस्ते सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच बाहेर गावाहून आलेल्या सर्व डॉक्टर मित्र परिवाराचे पान २ वर

## केजमध्ये भ्रष्टाचाराचे साचले ढव

सवाल:चिंचोली माळीच्या रोडसाठी काय बक्षीस घेणार!

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील चिंचोली माळी ते हादगाव रोडवर आमदारा नमीता लोखंडे यांच्या मतदार संघात भर उन्हाळ्यात भ्रष्टाचाराचे ढव साचले आहेत आमदारा नमीता लोखंडे यांनी जनाची नव्हे तर मनाची तरी बाळगुन चिंचोली माळी ते हादगाव रोडवर कमीत कमी मुरूम तरी टाकावा असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे कारण साध शाळेतलं लहान मुले मुली चालू लागले तर रोडवर पडलेल्या खड्ड्यांत बुडतील एवढे पाणी रोडवर साचले आहे व आमदारा नमीता लोखंडे मात्र दील्लीच्या गप्पा मारत असताना दीसत आहे चिंचोली माळी ते पान २ वर



## महामार्गाच्या कामासाठी वृक्षतोड !

चित्र:विकासाच्या नावाखाली विसर्गाचा ऱ्हास

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:केज शहरातून गेलेल्या आहिल्यानगर अहमदपूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम करताना मोठमोठ्या वृक्षांची कत्तल करण्यात आली होती. रस्त्यांचे काम पूर्ण होऊन ही आता वृक्ष लागवडीस टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे निसर्ग प्रेमींतून नाराजी व्यक्त केली जात असून पावसाळ्यात वृक्ष लागवड करावी, अशी मागणी होत आहे. आहिल्यानगर अहमदपूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम करीत असताना मांजरसुंबा केज लोखंडी सावरगाव या ७० किमी अंतराच्या रस्त्यावर असलेली मोठ्या वटवृक्षांसह इतर झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल करण्यात आली. रस्त्याच्या कामासाठी पाच वर्षाहून अधिक कालावधी गेला असून आता रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. आता संबंधित काम करणाऱ्या एजन्सीकडून टोल वसुलीसाठी डोणगाव फाट्याजवळ टोलनाक्याचे काम पूर्ण केले जात आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वृक्ष लागवड करण्याचे नियोजन होते. सध्या या रस्त्याच्या बाजूला अनेक मोठ्या पान २ वर

## परळीमध्ये यथोचित सत्कार



परळी:ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा इंजि.शशिकांत उरगुंडे यांनी दि.१९ मे रोजी बसवण्णांचे कन्नड भाषेतील महाकवी हरिहर रचित पहिले चरित्र 'बसवराजदेवर रगळे' चा मराठी अनुवाद ग्रंथ 'बसवराजदेवांचे काव्य' सुप्रसिद्ध साहित्यिक रानबा गायकवाड, फुले-शाहू- आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक भगवान साकसमुद्रे आणि दै.मराठवाडा साथीचे कार्यकारी संपादक ओमप्रकाश बुरांडे यांना सप्रेम भेट देण्यात आले.

## परळी आगारात नव्या दहा लालपरी!

अजय मुंडे: मान्यवरांच्या हस्ते बस सेवेत रुजू



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: वैद्यनाथ मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असल्याने येथील एसटी महामंडळाच्या आगारात नव्या दहा लाल परी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या असून या बसेसचे युवक नेते अजय मुंडे यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते व महामंडळाच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पूजन करून लोकार्पण करण्यात आले. बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असलेल्या परळी आगारात ये - जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असल्याने येथे नवीन २० बसेसची मागणी धनंजय मुंडे यांनी केली होती. त्यापैकी महामंडळाच्या वतीने सध्या दहा नवीन बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत.

या बसेसचे आज विधिवत पूजन करून लोकार्पण करण्यात आले, यावेळी अजय मुंडे यांच्या सह मान्यवर पदाधिकारी व नागरिकांनी नवीन बस मधून फ `रफटका पान २ वर

## अरुणा मिटकरी हिचा सत्कार

कार्यक्रम:कन्हेरवाडी ग्रामस्थांकडून नियोजन

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील कन्हेरवाडी येथील अरुणा पांडुरंग मिटकरी हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेत सार्वजनिक बांधकाम विभागात उप अभियंता पदी या अत्यंत प्रतिष्ठित पदासाठी निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.कु.अरुणा पांडुरंग मिटकरी यांचे शिक्षण जि.प.प्रा.शाळा कन्हेरवाडी येथे सातवी पर्यंत झाले होते एसएससी पर्यंतचे शिक्षण विद्या भवन हायस्कूल पान २ वर




**बोंबला** | **घर घर अभियानाच्या निधीला घरघर**

# गेवराईचे गट शिक्षणाधिकारी झाले कंत्राटदार !

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:अमृतमहोत्सवी वर्षात संविधानाचा जागर करून , शालेय स्तरावर अमृत महोत्सव घर घर संविधान साजरा करण्यासाठी शिक्षण विभागाने कृती कार्यक्रम घेण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, येथील शिक्षण विभागाने कोणताही उपक्रम न घेता, कागदोपत्रीच अभियान राबवून ; आलेला संपूर्ण निधी हडप केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असून, गेवराई चे गट शिक्षण अधिकारी स्वतःच कंत्राटदार झाल्याची चर्चा आहे. या संदर्भात, शिक्षण विभागाच्या उपसंचालक डॉ. माधुरी सावरकर यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात येणार आहे. दरम्यान, गेवराई तालुक्यात सरकारी-निमसरकारी शाळेची संख्या साडे तीनशेच्या जवळपास



असून, गट शिक्षणाधिकारी धनंजय शिंदे यांनी घर घर संविधान उत्सवाचे चार लाख नव्वद हजार रू ३१ मार्च च्या आधीच उचलले असल्याचे माहिती आहे.

राज्य सरकारच्या शिक्षण विभागाने दिलेल्या आदेशानुसार, शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा, शासन मान्यता प्राप्त अनुदानित, विनाअनुदानित, स्वयं अर्थसहाय्यित शाळा, आश्रमशाळा, वसतिगृहे , ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था, अशा सर्व ठिकाणी भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त, सन २०२४ -२०२५ या अमृतमहोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान साजरा करणे संदर्भात कळविले आहे. या कालावधीत संविधान दिन साजरा करण्यासाठी १६ सूचक उपक्रम देण्यात आले आंहेत. गेवराई तालुक्यातील शालेय स्तरावर अमृत महोत्सव साजरा करण्यात यावा म्हणून, प्रत्येक शाळेला १५०० रू देण्यात येणार होते. मात्र, धनंजय शिंदे यांनी सदरील पान २ वर

## सहाय्यक अभियंता पदावर रुजू

समारंभ:तेली समाजाकडून अमृता लखापतींचे स्वागत



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड च्या येथील उपविभागीय कार्यालयात नुकत्याच अमृता संजय लखापती सहाय्यक अभियंता (वर्ग २) पदावर रुजू झाल्या आहेत. प्रभारी उपकार्यकारी अभियंता अभिजीत राठोड यांनी त्यांना रुजू करून घेतले. याबदल तेली समाजाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

अमृता लखापती यांचे उपविभागात आगमन झाल्यावर कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. कनिष्ठ अभियंता रूपाली घोडगे, सहाय्यक लेखापाल संतोष आलापुरे आणि लिपिक पान २ वर